# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०११

## <u>प्रारुप विनियम</u>

## अनुक्रमणिका


**भाग ए : प्रारंभिक**

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ | १ |
| २. | व्याख्या | २ |
| ३. | भेदभावरहित मुक्त प्रवेशांची तरतूद | ६ |
| ४. | मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता | ७ |
| ५. | पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता | ९ |
| ६. | पारेषण यंत्रणेचे नियोजन | ११ |

**भाग बीः जोडणीयता**

| | | |
|---|---|---|
| ७. | जोडीणीयतेची मंजूरी | १४ |
| ८. | अर्जाची छाननी आणि राज्य पारेषण कंपनीशी जोडणीयतेची मंजुरी | १५ |

**भाग सीः मुक्त प्रवेशासाठी सर्वसाधारण तरतुदी**

| | | |
|---|---|---|
| ९. | दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेशांच्या मंजूरीसाठी निकष | १९ |

**भाग डीः मुक्त प्रवेशासाठी सर्वसाधारण तरतुदी**

| | | |
|---|---|---|
| १०. | मुक्त प्रवेशाची वर्गवारी | २२ |
| ११. | मुक्त प्रवेशासाठी अर्जाची कार्यपध्दती | २३ |
| १२. | दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपध्दती | ३१ |
| १३. | मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपध्दती | ३७ |

१४. अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपध्दती ४०
१५. राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र किंवा वितरण परवानाधारकाची मान्यता ४५
१६. थकबाकीदारांकडून आलेल्या अर्जावर विचार ४७
१७. वाटप करण्यासाठी प्राधान्य ४७

**भाग इः मुक्त प्रवेशासाठी आकार**

१८. पारेषण आकार ४९
१९. निर्धारण आणि यंत्रणा संचालन आकार ५०

**भाग एफः काल व परिमाण निर्धारण, मीटरच्या नोंदी,सुधारणा आणि हानि**

२०. काल व परिमाण निर्धारण ५२
२१. मीटरच्या नोंदी आणि संपर्क ५२
२२. सुधारणा ५४
२३. ऊर्जा हानि ५४

**भाग जीः असंतुलन आणि रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार**

२४. असंतुलन आकार ५५
२५. रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार ६२

**भाग एचः वाणिज्यिक मीटर्स**

२६. देयक तयार करणे, वसुली आणि वाटप ६३
२७. विलंब भरणा अधिभार ६५
२८. देयक अदा न केल्यास ६५
२९. प्रदान सुरक्षा पध्दती ६६
३०. वीज पुरवठा करण्याची आणि वापराची ठिकाणे बदलण्यात लवचिकता ६६

**भाग आयः माहिती प्रणाली**

३१.	माहिती प्रणाली	६८

**भाग जे: संकीर्ण**

३२.	राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेश क्षमतेचा वापर करणे किंवा वापर न करणे	७१

३३.	मुक्त प्रवेशांसाठीच्या क्षमता उपलब्धततेची परिगणना	७४

३४.	मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य	७५

३५.	अन्य वाणिज्यिक अटी	७७

३६.	राज्य ग्रीड संहितेचे पालन	७७

३७.	विद्यमान करार आणि नकाराचा प्रथम अधिकार	७८

३८.	दैवी आपत्ती	७८

३९.	सुधारणा करण्याचा अधिकार	८०

४०.	अडथळे दूर करण्याचे अधिकार	८०

४१.	आदेश व निर्देश देण्याच्या बाबी	८०

४२.	बचत	८०

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०११
## प्रारुप विनियम

**विद्युत अधिनियम, २००३**

क्रमांक मविनिआ/लिगल/ - विद्युत अधिनियम, २००३ (२००३चा ३६) च्या कलम १८१(२) सह कलम २ च्या उप-कलम (४७), कलम ३० आणि कलम ३२ च्या उप-कलम (३), नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, विनियमांमध्ये खालील सुधारणा करीत आहे, जसेः-

## भाग ए : प्रारंभिक

### १. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ

१.१. या विनियमांना महाराष्ट्र विद्युत आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०११ असे म्हणावे.

१.२. हे विनियम सर्व महाराष्ट्र राज्यात मुक्त प्रवेश आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी लागू राहतील.

१.३. हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

## २. व्याख्या

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसल्यास, या विनियमांमध्ये :-

ए. **“अधिनियम”** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

बी. **“वाटप केलेली क्षमता”** म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या दीर्घ-कालीन/मध्यम-कालीन ग्राहकाला पुरवठ्याच्या आणि वापराच्या विशिष्ट ठिकाणांमध्ये मेगावॅटमध्ये विजेचे हस्तांतरण करण्यास दिलेली परवानगी आणि ‘‘क्षमतेचे वाटप’’ या संज्ञेचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल.

सी. **“अर्जदार”** म्हणजे या विनियमानुसार राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकडे जोडणीस आणि/किंवा मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक़्ती ;

डी. **“अधिकृत प्रतिनिधी”** म्हणजे, पारेषण परवानाधारकाच्या किंवा राज्य भार प्रेषण केंद्राच्या, जसे असेल तसे, सर्वसाधारण अथवा विशिष्ट प्राधिकरणाखाली कार्ये करीत असलेले, पारेषण परवानाधारकाचे किंवा राज्य भार प्रेषण केंद्राचे सर्व अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी;

इ. **“मंडळ”** म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ;

एफ. **“ठोक वीज पारेषण करार”** म्हणजे, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेशासाठी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला ज्या करारांतील अटी व शर्तीनुसार हक्क प्राप्त झाला आहे असा करण्यात आलेला करार;

जी. **“केंद्रीय आयोग”** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये संबोधण्यात आलेला केंद्रीय विद्युत नियामक आयोग;

एच. **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

आय. **"जोडणीयता"** स्व-वापरासाठी वीज निर्मिती प्रकल्पासह ग्राहक किंवा राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकासह निर्मिती केंद्रांसाठी जोडणी म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडून घेण्याची अवस्था;

जे. **"ग्राहक"** वेळोवेळी झालेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम २०११ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे मुक्त प्रवेशासाठी पात्र असणारा कोणताही ग्राहक;

के. **"करारांतर्गत भार"** म्हणजे नियमन करणाऱ्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून वितरण परवानाधारकाने वेळोवेळी पुरवठा करण्यास मान्य केलेला केडब्ल्यु/एचपी/केव्हीए (किलो वॅट/हॉर्स पॉवर/किलो व्होल्ट ॲम्पिअर) मधील भार आणि संलग्न भारापासून वेगळा असेल;

एल. **"दिवस "** म्हणजे रात्री बारा (००.०० वाजता) पासून सुरु होणारा २४ तासांचा कालावधी;

एम. **"सविस्तर कार्यपद्धती"** म्हणजे येथील विनियम १० ते १४ मध्ये उल्लेख केल्यानुसार नोडल एजन्सीने प्रसिध्द केलेली कार्यपद्धती.

एन. **"आय इ जी सी"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७९ च्या उप-कलम १च्या खंड (एच्) अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेली आणि वेळोवेळी सुधारणा केलेले इंडियन इलेक्ट्रीसिटी ग्रिड कोड;

ओ. **"असंतुलन"-** निर्मिती केंद्राच्या वेळेच्या एका गटाकरिता असंतुलन म्हणजे केंद्राची एकूण प्रत्यक्ष वीज निर्मिती वजा एकूण निर्धारित वीज निर्मिती आणि ग्राहक किंवा

खरेदीदारासाठी असंतुलन म्हणजे त्याचा विजेचा एकूण वापर वजा एकूण निर्धारित वापर;

पी. **"दीर्घ-कालीन प्रवेश"** म्हणजे १२ वर्षापेक्षा जास्त परंतु २५ वर्षापेक्षा जास्त नसेल, अशा कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

क्यु. **"मध्यम-कालीन प्रवेश"** म्हणजे ३ महिन्यांपेक्षा जास्त परंतु ३ वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

आर. **"महिना"** म्हणजे ग्रेगोरियन कॅलेंडरप्रमाणे १ कॅलेंडर महिना;

एस. **"नोडल एजन्सी"** म्हणजे या विनियमांच्या विनियम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली नोडल एजन्सी;

टी. **"मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे ज्याला या विनियमांतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक, परवानाधारक किंवा निर्मिती कंपनी;

यु. **"अल्प-कालीन मुक्त प्रवेश"** म्हणजे एका वेळेस एका महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

व्ही. **"राज्य भार प्रेषण केंद्र"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (१) अंतर्गत स्थापन करण्यात आलेले राज्य भार प्रेषण केंद्र;

डब्ल्यु. **"राज्य ग्रिड संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (एच) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेली व वेळोवेळी सुधारणा केलेली राज्य ग्रिड संहिता, जी हे विनियम सुरु झाल्याच्या दिनांकाच्या दिवशी लागू होईल;

एक्स. **"राज्य पारेषण कंपनी "** म्हणजे अधिनियमच्या कलम ३९ च्या उप-कलम (१) अंतर्गत महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेली शासकीय कंपनी;

वाय. **"विशेष ऊर्जा मीटर"** म्हणजे केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व चालविणे) विनियम २००६ नुसार बसविलेले मीटर;

झेड. **"पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता"** म्हणजे विनियम ५.१ मधील विनियमामधील तरतुदी वगळून, ठोक वीज पारेषण करारानुसार, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेशासाठी पारेषण क्षमतेच्या हक्कांचे वाटप करण्यात आलेली व्यक्ती;

एए. **"पारेषण क्षमता हक्क"** म्हणजे, सर्वसाधारण परिस्थितीत, ठोक वीज पारेषण करारात निश्चित केलेल्या पुरवठ्याच्या आणि वापराच्या ठिकाणी, मेगावॅटमध्ये विजेचे हस्तांतरण करण्याचा, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा हक्क;

२.२ येथे वापरलेल्या शब्द आणि शब्दप्रयोगांना आणि या विनियमांत व्याख्या न केलेल्या पण अधिनियमात किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रीड संहिता किंवा नियम आणि विनियमांमध्ये व्याख्या केलेल्या शब्द आणि शब्दप्रयोगांना अधिनियम किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रीड संहिता किंवा नियम आणि विनियमांत, जसे असेल तसे, नमूद केल्याप्रमाणे अर्थ राहील

२.३ संसदेच्या अधिनियमांच्या अर्थनिश्चितीसाठी, वेळोवेळी सुधारणा केलेल्या, जनरल क्लॉजेस अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) चा ज्याप्रमाणे उपयोग करण्यात येतो त्याप्रमाणे या विनियमांच्या अर्थनिश्चितीसाठी, सदर अधिनियमाचा उपयोग करण्यात येईल.

## ३. भेदभावरहित मुक्त प्रवेशाची तरतूद

३.१. या विनियमानुसार, पारेषण परवानाधारक राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत अशा पारेषण परवानाधारकास भेदभावरहित मुक्त प्रवेश देईल.

३.२. मुक्त प्रवेशाच्या मंजूरीपूर्वी जोडणीची उभारणी करण्याची आवश्यकता

(एक) “हे विनियम अंमलात आल्यानंतर, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या संबंधात, दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेश यांच्या जोडणीच्या मंजूरीकरिता लागू राहतील.

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत जोडणी मागणाऱ्या स्व-वापरासाठीचे वीज निर्मिती प्रकल्प किंवा ग्राहक यांच्यासहित वीज निर्मिती केंद्रांनी जोडणीसाठी अर्ज केल्याशिवाय ते दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज करु शकणार नाहीत.

परंतु आणखी असे की, जोडणी आणि दीर्घ-कालीन किंवा मध्यम-कालीन प्रवेशाकरिता व्यक्ती एकाच वेळी अर्ज करु शकेल.

३.३ नोडल एजन्सीची निश्चिती

(एक) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी, दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशांच्या मंजूरीसाठी नोडल एजन्सी ही राज्य पारेषण कंपनी असेल.

परंतु असे की, या विनियमांखाली अल्प-कालीन प्रवेशाच्या मंजुरीसाठी राज्य भार प्रेषण केंद्र ही नोडल एजन्सी असेल.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०११ खाली मुक्त प्रवेशाकरिता अर्ज केलेल्या त्याच्या कोणत्याही ग्राहकाच्या मुक्त प्रवेशाच्या मंजूरीसाठी राज्य भार प्रेषण केंद्राशी समन्वय साधेल.

## ४. मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता

४.१ ए

(एक) अशी निर्मिती कंपनी, जिच्या मालकीचे राज्यात वीज निर्मिती केंद्र असेल किंवा वीज निर्मिती केंद्राचे ती संचालन करत असेल किंवा जिचा वीज निर्मिती केंद्राच्या मालकीचा किंवा त्याचे संचालन करण्याचा विचार असेल;

(दोन) अशी व्यक्ती ज्याने राज्यात स्वः वापरासाठी वीज निर्मिती प्रकल्पाची उभारणी, देखभाल आणि संचालन केले आहे किंवा जिचा स्वः वापरासाठी वीज निर्मिती प्रकल्पाची उभारणी, देखभाल आणि संचालन करण्याचा विचार असेल;

(तीन) विजेचे वितरण करण्यासाठीच्या परवान्याकरिता अर्ज केला आहे असा वितरण परवानाधारक किंवा व्यक्ती;

(चार) या विनियमानुसार, वीज व्यापार परवानाधारक किंवा विजेचा व्यापार करण्यासाठीच्या परवान्याकरिता अर्ज केला आहे अशी व्यक्ती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेशाकरिता अर्ज करण्यास पात्र राहील.

४.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेश अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप कलम (२) मधील तरतुदींना अनुसरुन आयोगाने सुरु केल्यानंतर आणि विनिर्दिष्ट केल्यानंतर अशा मुक्त प्रवेशासाठी ग्राहक अर्ज करण्यास पात्र राहील.

परंतु असे की, असा ग्राहक, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींव्यतिरिक्त, आयोगाने त्यासाठी तयार केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट असलेल्या अशा अटींच्या देखील, अधीन राहील.

४.३ पारेषण मुक्त प्रवेश उपयोगकर्ता तीन वर्गवारीमध्ये विभाजित करण्यात येतील, जसे :-

अ) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

बारा (१२) वर्षांहून अधिक परंतु पंचवीस (२५) वर्षांहून कमी अवधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतून प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा विचार करणारी व्यक्ती दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता असेल.

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा विद्यमान दीर्घ-कालीन लाभधारक विशिष्ट यंत्रणेचा दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईल.

ब) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

तीन (३) महिन्याहून अधिक परंतु तीन (३) वर्षांहून कमी अवधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतून प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा विचार करणाऱ्या व्यक्तीला मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून संबोधण्यात येईल.

सी) अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

तीस (३०) दिवसापेक्षा कमी अवधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतून प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा विचार करणाऱ्या व्यक्तीला अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून संबोधण्यात येईल.

परंतु आणखी असे की, अल्प-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता त्याच्या मुदतीच्या समाप्तीनंतर नवीन आरक्षण मिळवण्यास पात्र आणि पुनःपात्र राहील.

४.४ मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या वेळी नादार किवा दिवाळखोर म्हणून घोषीत केलेली किंवा पारेषण परवानाधारकाची दोन महिन्यांहून अधिक कालावधीची देणी बाकी असलेली व्यक्ती पात्र राहणार नाही.

## ५. पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता

५.१ या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेच्या वेळी असलेला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता हा अशा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा एक उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईलः

परंतु असे की, शासकीय कंपनी किंवा अधिनियमाच्या कलम १३१ च्या उप-कलम (२) मध्ये नमूद केलेली कंपनी ही, त्या कलमानुसार हस्तांरण योजना तयार करण्यात आल्याच्या तारखेपासून राज्य विद्युत मंडळ वापरत असलेल्या कोणत्याही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेची, पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईल.

परंतु आणखी असे की, या विनियमाखाली राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा उपयोगकर्ता हा, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता म्हणून मानण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत, पारेषण परवानाधारकांशी ठोक ऊर्जा पारेषण करार करेल.

५.२ या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेला वरील विनियम ५.१ खालील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने, आयोगाच्या परवानगीने, पारेषण यंत्रणेत वीज पुरवठा करण्यासाठी करार किंवा अन्य व्यवस्थेद्वारे घेतलेल्या एकूण वीज निर्मिती क्षमतेच्या सममूल्य पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत

पारेषण क्षमता हक्क राहीलः परंतु असे की, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकाच्या वेळी असलेला अशा पारेषण क्षमतेच्या हक्कांचा कालावधी, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने वीज निर्मिती क्षमता प्राप्त केल्याच्या करार किंवा अन्य व्यवस्थेच्या कालावधीतील शिल्लक कालावधी असेल;

परंतु आणखी असे की, वरील विनियम ५.१ मधील पहिल्या परंतुकाखालील पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, अशा पारेषण प्रणाली उपयोगकर्त्याला वाटप करण्यात आलेल्या निर्मिती क्षमतेइतके हस्तांतरण योजनेतील शर्तीनुसार व त्यामध्ये देण्यात आलेल्या कालावधीसाठी, राज्यांतर्गत पारेषण प्रणालीमध्ये पारेषण क्षमतेचे हक्क असल्याचे मानण्यात येईल.

परंतु आणखी असेही की, या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेस जेव्हा एखादा पारेषण यंत्रणा परवानाधारक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या भविष्यातील गरजांसाठी पारेषण यंत्रणेचे बळकटीकरण करत असेल तेव्हा, अशा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, यंत्रणेतील अशा बळकटीकरणामुळे उपलब्ध झालेल्या क्षमतेचेही हक्क देण्यात येतील.

## ६.	पारेषण यंत्रणेचे नियोजन

६.१	या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेपासून एकशे ऐंशी दिवसांच्या (१८०) आत, राज्य पारेषण कंपनी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी पारेषण यंत्रणेची योजना त्याच्या इंटरनेटच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील आणि कोणत्याही व्यक्तिस विनंतीवरुन सदर योजना उपलब्ध करुन देईल.

परंतु आणखी असे की, विनियम ६.१ चे पालन करुन तयार करण्यात आलेली पारेषण यंत्रणेची योजना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम ८.१ आणि विनियम ८.२ चे पालन करुन तयार करण्यात आलेल्या आधीच्य पारेषण यंत्रणेच्या योजनेचे अद्ययावतीकरण असेल.

६.२	अशा पारेषण प्रणाली योजनेचा कालावधी तिच्या प्रसिध्दीचे वर्ष संपल्यानंतर लगेच सुरु होणाऱ्या वित्तीय वर्षापासून सुरु होऊन पाच (५) वर्षे एवढा असेलः

परंतु असे की, विनियम ६.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीनुसार प्रसिध्द केलेली पारेषण यंत्रणा योजना राज्य पारेषण यंत्रणेडून, प्रत्येक वर्षीच्या ३० सप्टेंबरपर्यंत अद्ययावत करण्यात येईल आणि योजनेच्या प्रसिध्दीचे वर्ष संपल्यानंतर लगेच सुरु होणाऱ्या वित्तीय वर्षापासून ती सुरु होऊन तिचा कालावधी पाच (५) वर्षांचा असेल.

६.३	पारेषण यंत्रणा योजनेमध्ये, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठीच्या योजनेचे वर्णन असावे आणि त्यात सर्व उपयोगकर्त्यांच्या फायद्यासाठी प्रस्तावित राज्यांतर्गत पारेषण प्रकल्प तसेच यंत्रणा बळकट करणाऱ्या प्रकल्पांचा अंतर्भाव असावा.

६.४	राज्य पारेषण कंपनी, या विनियमांखाली पारेषण यंत्रणेची योजना बनविण्यासाठी निर्मिती क्षमतेतील वाढ, यंत्रणेतील वाढ आणि भाराचा दीर्घकालीन अंदाज आणि

विनियम ८, १२ आणि १३ अंतर्गत मुक्त प्रवेशासाठी केले गेलेले सर्व अर्ज या बाबींसह त्याला हवी असलेली माहिती मागवू शकतेः

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी पारेषण यंत्रणा योजना बनविताना या विनियमांनुसार दिलेली माहिती विचारात घेईल, परंतु अशी माहिती त्याच्यावर बंधनकारक असणार नाही.

६.५ या विनियमांखाली पारेषण यंत्रणा योजना तयार करण्यासाठी राज्य पारेषण कंपनी खालील बाबी विचारात घेईलः

(एक) अधिनियमाच्या कलम ७३ च्या खंड (ए) च्या तरतुदीनुसार प्राधिकरणाने पारेषण यंत्रणेसाठी बनविलेल्या योजना;

(दोन) केंद्रीय पारेषण कंपनीने तयार केलेल्या योजना;

(तीन) प्राधिकरणाचा इलेक्ट्रिक पॉवर सर्वे ऑफ इंडियाचा अहवाल;

(चार) अधिनियमाच्या कलम ७३ च्या खंड (डी) खाली प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेली ग्रीड मानके; आणि

(पाच) प्रादेशिक ऊर्जा समितीच्या, असल्यास, शिफारशी/माहिती.

६.६ राज्य पारेषण कंपनी, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (१) खाली आयोगाकडे मान्यतेसाठी अर्ज सादर करताना, त्या अर्जासोबत, निश्चित केलेल्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा योजनेवर आधारित गुंतवणूक आराखडा आणि पारेषण यंत्रणा योजनेत प्रस्तावित केलेले यंत्रणा बळकटीकरणाचे कार्यक्रम देखील सादर करील.

६.७ जर राज्य पारेषण कंपनीच्या गुंतवणूक आराखड्यात पारेषण यंत्रणा योजनेमध्ये निश्चित केलेल्या सर्व राज्यांतर्गत पारेषण योजना किंवा पारेषण यंत्रणा योजनेत समाविष्ट असलेल्या यंत्रणा बळकटीकरणाच्या कार्यक्रमांचा अंतर्भाव नसेल तर, आयोग, स्वेच्छाधिकाराचा वापर करुन, गुंतवणूक आराखड्यात समाविष्ट न केलेल्या योजना राबविण्यासाठी आदेश किंवा निर्देश देऊ शकेल, ज्यामध्ये खालीलपैकी कोणतीही गोष्ट असू शकेलः-

अ) अशी योजना राबविण्यासाठी अशा पारेषण क्षेत्रात असलेल्या दुस-या कोणत्याही पारेषण परवानाधारकाला निमंत्रित करणेः किंवा

ब) अशा योजना राबविण्यासाठी, आयोगाला योग्य वाटेल अशा शर्तीवर नवीन पारेषण परवानाधारकांसाठी अर्ज मागविणे.

६.८ या विनियमांनुसार पारेषण यंत्रणा नियोजना संबंधीच्या अभ्यासाच्या खर्चास अधिनियमाच्या कलम ६२ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) खाली राज्य पारेषण कंपनीचे आकार निश्चित करताना परवानगी देण्यात येईल.

# भाग बी : जोडणीयता

## ७. जोडणीयतेची मंजूरी

७.१ श्रेयस्करपणे, ५ मेगावॅट आणि त्याहून अधिक भार असलेला ग्राहक किंवा ५ मेगावॅट आणि त्याहून अधिक क्षमता असलेले निर्मिती केद्र, पूर्वी जोडलेले नसल्यास, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकडून जोडणी घेण्यास पात्र राहील आणि या भागातील तरतुदींनुसार जोडणीयतेसाठी अर्ज करेल.

परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनी व्होल्टेज आणि क्षमता काहीही असली तरी अती उच्च दाबाच्या उप-केंद्रापासून फिडरमार्फत अती उच्च दाबाच्या उप-केंद्राशी जोडल्या गेलेल्या जनरेटरच्या जोडणीयतेची मंजूरी देईल.

७.२ राज्य पारेषण कंपनीने विहित केलेल्या जोडणीयतेसाठीची संपूर्ण कार्यवाही असलेल्या नमुन्यामध्ये अर्जदार राज्य पारेषण कंपनीकडे जोडणीयतेसाठी अर्ज करु शकेल.

७.३ अर्जासोबत डिमांड ड्राफ्टमार्फत विना-परताव्याची दोन लाख रुपयांची फी जोडण्यात यावी.

७.४ जोडणीयतेसाठीच्या अर्जात सविस्तर माहिती असेल, जसे की, अर्जदाराचे नियोजित भौगोलिक ठिकाण, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आंतरबदल करावयाच्या विजेचे परिमाण म्हणजेच स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्राच्या बाबतीत पुरवठा करावयाच्या विजेचे परिमाण आणि ग्राहकाने वापरावयाच्या विजेचे परिमाण, आणि राज्य पारेषण कंपनीतर्फे सविस्तर कार्यपध्दतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा अन्य तपशील.

परंतु असे की, एकदा अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर अर्जदाराच्या ठिकाणामध्ये कोणताही भौतिक बदल झालेला असेल किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आंतरबदल करावयाच्या विजेच्या परिमाणात १० % हून अधिक बदल झाल्यास, अर्जदाराला नवीन अर्ज करावा लागेल, जो या विनियमांनुसार राहील.

## ८. अर्जाची छाननी आणि राज्य पारेषण कंपनीची जोडणीयतेची मंजूरी

८.१ राज्य पारेषण कंपनी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, वितरण परवानाधारकाच्या जाळ्याचा वापर करण्याची शक्यता असल्यास परिसरातील वितरण परवानाधारकासहित राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करणाऱ्या अन्य संस्थांशी विचारविनिमय करुन आणि समन्वय साधून, अर्जाची छाननी करील आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रिडच्या जोडीणीसाठी तांत्रिक मानके) विनियम, २००७ नुसार आवश्यक्ष ऑतर-जोडणी अभ्यास करील.

८.२ जोडणी मंजूर करताना, राज्य पारेषण कंपनी जेथे जोडणी मंजूर करावयाची आहे ते उप-केंद्र किंवा लुपिंग केंद्र किंवा स्वीचयार्ड यांचे नाव विनिर्दिष्ट करील. विद्यमान किंवा नियोजित वाहिनीच्या लुपिंग इन आणि लुपिंग आऊटने जोडणी मंजूर करावयाची असल्यास, राज्य पारेषण कंपनी मंजूर करण्यात आलेल्या जोडणीचे ठिकाण आणि वाहिनीचे नाव विनिर्दिष्ट करील. राज्य पारेषण कंपनी समर्पित पारेषण वाहिन्यांचा विस्तृत संकल्पचित्र आराखडा आणि समर्पित पारेषण वाहिन्या पूर्ण करण्यासाठीची कालमर्यादा दर्शविल.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनीने उभारावयाच्या समर्पित पारेषण वाहिन्यांच्या टप्प्यांची कालमर्यादा निर्मिती सुविधा आणि अर्जदारांच्या सुविधा यांच्या उभारणीस लागणाऱ्या कालावधीइतकी असेल. परंतु आणखी असे की, समर्पित पारेषण वाहिन्या

विकसित करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा यासाठी जोडणीसाठीचा अर्जदार आणि निर्मिती सुविधा अर्ज सादर करतील.

८.३ अर्जदार आणि राज्य पारेषण कंपनीसहित सर्व राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रीडला जोडणीसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २००७ मधील तरतुदींचे पालन करतील.

८.४ अर्जदार, जेथे जोडणी मंजूर करण्यात येत आहे तेथील नोडल एजन्सीने निश्चित केल्याप्रमाणे उप-केंद्र किंवा पुलिंग केंद्र किंवा स्वीच-यार्ड किंवा पारेषण वाहिन्या यांचे मालक असलेल्या राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकांशी, जोडणी करार करेल.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पासहित वीज निर्मिती केंद्र किंवा अर्जदाराची जोडणी मंजूर करण्यात आली असल्यास, अर्जदार, राज्य पारेषण कंपनी आणि अशा राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकांमध्ये केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रीडला जोडणीसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २००७ मध्ये देण्यात आल्याप्रमाणे त्रिपक्षीय करार करण्यात यावा.

८.५ अर्जदाराने दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश, जसे असेल तसे, प्राप्त केल्याशिवाय, अर्जदारास ग्रीडशी विजेचा कोणताही आंतरबदल करण्याचा हक्क जोडणीच्या मंजुरीने मिळणार नाही.

८.६ राज्यांतर्गत ग्रीडशी जोडणीची मान्यता देण्यात आलेल्या स्व-वापरासाठीच्या वीजनिर्मिती प्रकल्पासहित वीज निर्मिती केंद्रांना, त्यांची वीज वाणिज्यिक वापरास देण्यास सुरुवात करण्यापूर्वी, तसेच कोणत्याही प्रकारचा मुक्त प्रवेश मिळवण्यापूर्वी, ग्रीडशी सुरक्षितता लक्षात घेऊन संबंधित राज्य भार प्रेषण केंद्राने परवानगी दिल्यानंतर, ग्रीडमध्ये अनिश्चित विजेचा पुरवठा करुन पूर्ण भार क्षमतेची चाचणी

करण्याची परवानगी देण्यात येईल. अ-पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर आधारित असणाऱ्या वीज निर्मिती केंद्रांपेक्षा अन्य वीज निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, वीज निर्मिती केंद्र किंवा त्याच्या संयंत्राच्या सदर अनिश्चित विजेच्या चाचणीचे आकार आणि विजेचा दराचे नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ किंवा वेळोवेळी सुधारणा झालेल्या वैधानिक फेर-कायद्याद्वारा करण्यात येईल. राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर (एबीटी) प्रणाली खाली आयोगाने निश्चित केलेला असंतुलन दर किंवा वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज दराच्या आदेशामध्ये मागील वर्षी आयोगाने परवानगी दिलेल्या दीर्घ-कालीन वीज दराचे सरासरी वीज खरेदी शुल्क, यांपैकी जो दर कमी असेल, त्याप्रमाणे अशा चाचणीमुळे अन्य वीज निर्मिती केंद्रांमधून ग्रीडमध्ये पुरविण्यात आलेल्या विजेवर आकारणी करण्यात येईल.

परंतु असे की, अनिश्चित विजेचा पुरवठा करण्याआधी, स्व-वापराच्या निर्मिती प्रकल्पांसहित वीज निर्मिती केंद्र, अनिश्चित विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाशी करार करील. परंतु आणखी असेल की, विजेची विक्री करण्याचा करार नसल्यास विजेचा पुरवठा मोफत वीज विक्री म्हणून मानण्यात येईल.

परंतु आणखी असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आधीच जोडल्या गेलेल्या किंवा विद्यमान करारांतर्गत आधीच जोडणी मंजूर झालेल्या जनरेटर किंवा ग्राहकांना समान क्षमतेसाठी अर्ज करण्याची गरज आवश्यकता नाही. तथापि, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांसहित वीज निर्मात्याच्या क्षमतेत वाढ झाल्यास किंवा ठोक ग्राहकाच्या विजेच्या गरजेत वाढ झाल्यास विनियमातील तरतुदीनुसार जोडणीमध्ये फेरबदल करण्यासाठी नवीन अर्ज करणे आवश्यक राहील.

८.७ राज्यांतर्गत ग्रीडशी जोडणी देणे सुलभ होण्यासाठी राज्य पारेषण कंपनी अर्जदारास जोडणीच्या ठिकाणी समर्पित वाहिनी उभारण्याबाबत सांगू शकेल.

परंतु असे की, स्व-वापराच्या वीज निर्मिती प्रकल्पांच्या व्यतिरिक्त, ५०० मेगावॅट आणि त्याहून अधिक क्षमतेचे औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र आणि २५० मेगावॉट आणि त्याहून अधिक क्षमतेच्या जल विद्युत निर्मिती केंद्रांना जोडणीच्या ठिकाणापर्यंत समर्पित वाहिनी उभारण्याची आवश्यकता राहणार नाही आणि अशा केंद्रांना राज्य पारेषण कंपनीकडून समन्वयित पारेषण नियोजनासाठी विचारात घेण्यात येईल.

८.८ राज्य पारेषण कंपनी जोडणीच्या मंजूरीबाबतचा तिचा निर्णय अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या आत कळविल.

# भाग सीः मुक्त प्रवेशांसाठी सर्वसाधारण तरतुदी

## ९. दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेशांच्या मंजूरीसाठी निकष

९.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत क्षमता उपलब्ध असेल तेथे, नोडल एजन्सी मुक्त प्रवेशासाठीचे अर्ज ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्वावर विचारात घेईल.

९.२ एकाच दिवशी दोनपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या प्रवेशासाठी कमी कालावधीच्या प्रवेशाच्या अर्जाऐवजी दीर्घ कालावधीच्या प्रवेश अर्जाला अग्रक्रम देण्यात येईलः

परंतु असे की, एकाच दिवशी समान कालावधीसाठी दोन किंवा अधिक अर्ज प्राप्त झाले तर पारेषण क्षमता हक्काचे वाटप करण्यासाठी सर्व अर्ज समानतया (parri passu) मानण्यात येतील आणि सर्व अर्जांना सामावून घेण्यास पुरेशी उपलब्ध क्षमता नसली तर अर्ज करण्यात आलेल्या क्षमतेसाठी यथाप्रमाण उपलब्ध क्षमतेचे वाटप करण्यात येईल.

९.३ अर्ज प्राप्त झाल्यावर नोडल एजन्सी यंत्रणा अभ्यास करील आणि खालील विनियम ११ मध्ये देण्यात आलेल्या कालमर्यादत अर्जदारास मुक्त प्रवेशाला परवानागी देण्यात येईल की कसे याबाबत कळविल. परंतु असे की, निर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आधी अर्जदारास निर्णय कळविण्याचे स्वातंत्र्य नोडल एजन्सीला असेल.

९.४ दीर्घ-कालीन प्रवेशाचा मंजूर करण्यापूर्वी, राज्य पारेषण कंपनी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेची विनियमात प्रस्तावित करण्यात आलेली आवश्यक वाढ विचारात घेईल.

९.५ विद्यमान पारेषण यंत्रणेत किंवा अंमलबजावणी खालील पारेषण यंत्रणेत उत्पन्न झालेल्या विजेचा प्रवाह समाविष्ट करावयाचा असल्यास मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन प्रवेश यांना मंजूरी देता येईल.

परंतु असे की, फक्त मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश यांच्या मंजुरीच्या उद्देशासाठी पारेषण यंत्रणेतील ही वाढ करण्यात येणार नाही.

परंतु असे की, या विनियमाच्या प्रयोजनासाठी समर्पित पारेषण वाहिनीची उभारणी ही पारेषण यंत्रणेतील वाढ म्हणून समजण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, या विनियमाखालील माहितीतून, जोपर्यंत यंत्रणा बळकटीकरणातून उत्पन्न झालेली क्षमता उपलब्ध होत नाही तोपर्यंत राज्यांतर्गत पारेषण यंत्रेणत अर्जदाराचा कोणताही पारेषण क्षमता हक्क निर्माण होतो, असे मानण्यात येऊ नये.

परंतु आणखी असेही की, राज्य पारेषण कंपनी पारेषणाच्या बळकटीकरणाची आवश्यकता आहे का हे निश्चित करताना आयोगाने वेळोवेळी परवानगी दिलेल्या मूल्यमापनाच्या पध्दतींचा वापर करु शकेल.

परंतु आणखी असेही की, मूल्यमापनाच्या अशा पध्दती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे स्थैर्य आणि उचित संचालन, पारदर्शकत्व ध्यानात घेईल आणि राज्य ग्रीड संहितेची गरज ध्यानात घेईल.

९.६ या विनियमानुसार, जेथे पारेषण क्षमता हक्कांचे वाटप अर्जदारास करण्यात आलेले आहे, अर्जदार, वाटप करण्यात आलेल्या क्षमतेच्या मर्यादेपर्यंत आणि या विनियमात आणि राज्य ग्रीड संहितेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादांच्या अधीन राहून, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील प्रवेशासंबंधातील अन्य सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना समानतया असेल.

९.७ प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता, त्याला पारेषण क्षमता हक्कांचे वाटप करण्याच्या वेळी, प्रवेशासाठी आणि पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्यासाठी, पारेषण परवानाधारकाबरोबर ठोक वीज पारेषण करार करेल.

९.८ प्रत्येक पारेषण परवानाधारक, या विनियमांच्या अधिसूचनेच्या ९० दिवसांच्या आत, त्याच्या इंटरनेटच्या संकेत-स्थळावर, आवश्यक मार्गदर्शक पुस्तिका, प्रक्रिया आणि ठोक वीज पारेषण कराराचा नमुना, प्रदर्शित करेल.

परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त पारेषण परवानाधारकाच्या जाळ्यात प्रवेश करणाऱ्या ग्राहकांच्या बाबतीत मुक्त प्रवेश ग्राहक, राज्य पारेषण कंपनी आणि असे अन्य पारेषण परवानाधारक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार होईल.

९.९ ठोक वीज पारेषण करार होण्यापूर्वी जोडणीची उभारणी करण्यात आलेली आहे याची खात्री नोडल एजन्सी करुन घेईल.

# भाग डी: मुक्त प्रवेशासाठी सर्वसाधारण तरतुदी

## **१०. मुक्त प्रवेशाची वर्गवारी**

१०.१ मुक्त प्रवेश ग्राहकांच्या वर्गवारी

मुक्त प्रवेश मिळवू पाहणाऱ्या पात्र ग्राहकाने अर्ज करावयाची पध्दत, अर्जाचे शुल्क आणि अर्जाच्या छाननीची कालमर्यादा खालील निकषांवर आधारलेली असेल.

१०.१.१. वीज पुरवठा काढून घेण्याच्या आणि पुरवठा करण्याची आपसांतील ठिकाणे

(ए) राज्यामध्येच पण वेगवेगळ्या वितरण यंत्रणेमध्ये

(बी) वेगवेगळ्या राज्यांमध्ये

१०.१.२. मुक्त प्रवेशाचा कालावधी

(ए) दीर्घ-कालीन प्रवेश

बारा (१२) वर्षांहून अधिक परंतु पंचवीस (२५) वर्षांहून कमी अवधीसाठी वितरण यंत्रणेतून प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा उद्देश असणारी व्यक्ती दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता असेल.

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा विद्यमान दीर्घ-कालीन लाभधारक विशिष्ट यंत्रणेचा दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून मानला जाईल.

(ब) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

तीन (३) महिन्याहून अधिक परंतु तीन (३) वर्षांहून कमी अवधीसाठी वितरण यंत्रणेतून प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा उद्देश असणाऱ्या

व्यक्तीला मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून संबोधण्यात येईल.

(सी) <u>अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता</u>

तीस (३०) दिवसापेक्षा कमी अवधीसाठी वितरण यंत्रणेतून प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा उद्देश असणाऱ्या व्यक्तीला अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून संबोधण्यात येईल.

परंतु आणखी असे की, अल्प-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता त्याच्या मुदतीच्या समाप्तीनंतर नवीन आरक्षण मिळवण्यास पात्र आणि पुनःपात्र राहतील.

## ११ मुक्त प्रवेशासाठी अर्जाची कार्यपध्दत

११.१ या विनियमानुसार, मुक्त प्रवेशासाठीचे सर्व अर्ज विहित नमुन्यात तयार करण्यात येतील आणि नोडल एजन्सीकडे सादर करण्यात येतील.

११.२ नोडल एजन्सी, अर्जाचे शुल्क, अर्जाबरोबर जोडावयाचे दस्तऐवज आणि अर्ज निकालात काढावयाची कालमर्यादा खालील कोष्टकात विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे असेलः

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण** | **नोडेल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे** | **अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात)** |
| १. | अल्प-कालीन मुक्त प्रवेश | दोघेही राज्यामधील (राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये) | राज्य भार प्रेषण केंद्र | ५,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, निश्चित ऊर्जा कराराचा पुरावा, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याची संमती प्रत | ●अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास कामाच्या सात (७) दिवसात<br>●त्यानंतरच्या अ.का.मु.प्र अर्जासाठी कामाच्या तीन (३) दिवसात |
| २. | | राज्यातील वितरण यंत्रणेमध्ये वीज पुरवठ्याचे ठिकाण | राज्य भार प्रेषण केंद्र | ५००० | संबंधित वितरण परवानाधारकाकडून संमती, अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, निश्चित ऊर्जा कराराचा पुरावा, | ●अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास कामाच्या सात (७) दिवसात<br>●त्यानंतरच्या अ.का.मु.प्र |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण** | **नोडेल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे** | **अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात)** |
| | | | | | | अर्जासाठी कामाच्या तीन (३) दिवसात |
| ३. | | वेगवेगळ्या राज्यांमध्ये | ग्राहक वास्तव्य करीत असलेल्या प्रदेशाचे प्रादेशिक भार प्रेषण केंद्र | ५००० | लागू असल्यास, संबंधित प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि वितरण परवाधारकाची संमती, अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा. | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |
| ४. | | वीज **हस्तांतरणापासून वीज पुरवठा प्राप्त करुन घेणारा ग्राहक** | राज्य भार प्रेषण केंद्र | ५००० | ग्राहक ज्या वितरण परवानाधारकाशी जोडलेला असेल त्या वितरण परवानाधारकाची संमती, अर्जाचे शुल्क | ●अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास कामाच्या सात (७) दिवसात<br>●त्यानंतरच्या अ.का.मु.प्र |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण** | **नोडेल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे** | **अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात)** |
| | | | | | भरल्याचा पुरावा | अर्जासाठी कामाच्या तीन (३) दिवसात |
| ५. | मध्यम- कालीन मुक्त प्रवेश | दोघेही राज्यामधील (राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये) | राज्य पारेषण कंपनी | १००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, पी पी ए किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेला नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री | वीस (२०) |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण** | **नोडेल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे** | **अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात)** |
| | | | | | पूरावा | |
| ६. | | राज्यातील वितरण यंत्रणेमध्ये वीज पुरवठ्याचे ठिकाण | राज्य पारेषण कंपनी | १००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, पी पी ए किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेला नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, संबंधित वितरण परवानाधारकाची संमती | वीस (२०) |
| ७. | | वेगवेगळ्या राज्यांमध्ये | केंद्रीय पारेषण | १००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, पी पी ए किंवा | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण** | **नोडेल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे** | **अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात)** |
| | | | कंपनी | | विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, लागू असल्यास संबंधित प्रादेशिक भार प्रेषण केंद्रे आणि परवानाधारकाकडून संमती | |
| ८ | दीर्घ-कालीन प्रवेश | दोघेही राज्यामधील (राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये) | राज्य पारेषण कंपनी | २००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, बँकेची हमी, पी पी ए किंवा विजेची | • पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास एकशे वीस |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण** | **नोडेल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे** | **अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात)** |
| | | | | | विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, दी.का.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा | (१२०) दिवस<br>● पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास एकशे ऐंशी (१५०) दिवस |
| ९. | | राज्यातील वितरण यंत्रणेमध्ये वीज पुरवठ्याचे ठिकाण | राज्य पारेषण कंपनी | २००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, बँकेची हमी, पी पी ए किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेला नसेल तर, दी.का.प्र | ● पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास एकशे वीस (१२०) दिवस<br>● पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास एकशे ऐंशी (१५०) दिवस |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण** | **नोडेल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे** | **अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात)** |
| | | | | | देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, संबंधीत वितरण परवानाधारकाची संमती | |
| १० | | वेगवेगळ्या राज्यांमध्ये | केंद्रीय पारेषण कंपनी | २००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, बँकेची हमी, वीज खरेदी करार किंवा वीज विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेला नसेल तर, दी.का.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम | • केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | कालावधी | आपा-पसातील वीज काढून घेण्याचे आणि पुरवठ्याचे ठिकाण | नोडेल एजन्सी | अर्जाचे शुल्क (रुपये) | अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे | अर्ज निकाली करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या- पासूनच्या दिवसात) |
| | | | | | पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, संबंधीत राज्य भार प्रेषण केंद्रे आणि वितरण परवानाधारकांकडून लागू असल्याप्रमाणे संमती | |

## १२. दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धत

१२.१ **आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यासः**

या विनियम १२.२ मध्ये खाली काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधीत बाबी) विनियम, २००९ किंवा जे त्यांच्या वेळोवेळी सुधारणा केलेल्या फेर-कायद्याप्रमाणे असेल;

१२.२ **केवळ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यासः**

येथे वर नमूद केलेल्या विनियम १२.१ मधील तरतूदीना अधीन राहून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणमधील राज्यांतर्गत दीर्घ-कालीन प्रवेशांचा समावेश येथील पुढील उपखंड (ए) ते (आय) मधील तरतूदींना अनुसरुन असेल –

(ए) दीर्घ-कालीन प्रवेशास मंजूर करण्यासाठीच्या अर्जात जेथून वीज प्राप्त करुन घ्यावयाची असेल अशा कंपनीचे नाव किंवा कंपन्यांची नावे, प्राप्त करुन घ्यावयाच्या विजेचे मेगावॅट मधील परिमाण आणि राज्य पारेषण कंपनीने सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद केलेला इतर तपशील यांचा समावेश असेल. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश/मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी करावयाचा नमूना अर्ज जोडपत्र-२ मध्ये देण्यात आला आहे.

जेथे मुक्त-प्रवेश मंजूर करण्यासाठी पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असेल, आणि ज्या व्यक्तीला विजेचा पुरवठा करावयाचा आहे त्या व्यक्तीला पुरवठा करावयाच्या विजेचे परिमाण निश्चित करण्यात आलेले नसेल किंवा कोणत्या स्त्रोतातून वीज पुरवठा करावयाचा आहे ते निश्चित करण्यात आलेले नसेल तर, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करुन विजेचे जितके परिमाण आंतरबदल करावयाचे असेल, ते अर्जदार निर्देशित करेल;

परंतु आणखी असे की, पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असल्यास, त्यासाठी येणारा खर्च, जरी विजेचा पुरवठा किंवा खरेदी करण्याचे स्त्रोत निश्चित करण्यात आले नसले तरी, या विनियमानुसार अर्जदाराला करावा लागेल;

परंतु असेही की, अशी वाढ करणे सुलभ व्हावे यासाठी, वीज पुरवठ्याचा स्त्रोत किंवा वीज घेण्याचे ठिकाण, जसे असेल तसे, निश्चित करावे लागेल आणि त्यानुसार ते नोडल एजन्सीला, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश प्राप्त करुन घेण्याच्या उद्देशित दिनांकाच्या कमीत कमी तीन वर्षे आधी किंवा पारेषण यंत्रणेच्या वाढीकरिता राज्य पारेषण कंपनीने अंदाजित केलेला कालावधी, यापैकी जो कमी असेल त्यानुसार कळविणे आवश्यक आहे;

परंतू आणखी असे की, अर्जदाराच्या ठिकाणात महत्वाचा बदल झाला असल्यास किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करुन आंतरबदल करावयाच्या विजेच्या परिमाणात १० टक्यापेक्षा जास्त बदल झाला असल्यास, एक स्वतंत्र अर्ज करण्यात येईल आणि सदर अर्जाचा विचार या विनियमानुसार करण्यात येईल.

(बी) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन सर्व बाजूनी विचार करुन करणे नोडल एजन्सीला शक्य व्हावे यासाठी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करुन आंतरबदल करावयाच्या विजेचे निर्धारण करण्यासाठीचा आधार आणि विविध विद्युत कंपन्या किंवा प्रदेशांकडे किंवा त्यांच्यापासून पारेषण करावयाची वीज या बाबींच्या माहितीसह नोडल एजन्सी मागेल ती अन्य कोणतीही माहिती अर्जदार सादर करेल;

(सी) अर्जासोबत पारेषित करावयाच्या एकूण विजेच्या प्रती मेगावॅट रुपये १०,००० (दहा हजार) प्रमाणे बँक हमी जोडण्यात येईल. सदर बँक हमी ही नोडल एजन्सीच्या नावे असेल आणि ती सविस्तर कार्य पद्धतीमध्ये घालून देण्यात आलेल्या रितीनुसार असेल.

(डी) सदर प्रती मेगावॅट रुपये १०,००० (दहा हजार) ची बँक हमी ही, जर पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असेल तर दीर्घ-कालीन प्रवेश कराराची अंमलबजावणी होईपर्यंत आणि जर पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज नसेल तर दीर्घ-कालीन प्रवेश कार्यान्वित होईपर्यंत, वैध आणि अस्तित्वात राहील.

(इ) अर्जदाराने जर अर्ज मागे घेतला तर किंवा जेव्हा वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसेल तेव्हा दीर्घ-कालीन प्रवेशाचे हक्क सोडून देण्यात आले असतील तर नोडल एजन्सीकडून बँक हमीचे रोखीकरण करण्यात येईल.

(एफ) जेव्हा पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असेल तेव्हा बांधकाम चालू असतानाच्या टप्प्यात, राज्य पारेषण कंपनीला बँक हमी द्यावयाची गरज असल्यास, सविस्तर कार्यपद्धतीमधील तरतुदींनुसार, बँक हमी सादर केल्यानंतर बँक हमी देण्याची पूर्तता झाली असल्याचे मानण्यात येईल.

(जी) अर्ज प्राप्त झाल्यानंतर नोडल एजन्सी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करु शकणाऱ्या अन्य संस्थांशी विचार-विनिमय करुन आणि त्यांच्याशी समन्वय साधून, अर्जाची छाननी करेल आणि येथे वरील विनियम ११ च्या खंड २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करेल;

परंतु असे की, जर नोडल एजन्सीला विचार-विनिमयाच्या किंवा समन्वयाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण आली तर ती आयोगाकडे योग्य निर्देश मागू शकेल.

(एच) वरील यंत्रणा अभ्यासाच्या आधारे, दीर्घ-कालीन प्रवेश देण्यासाठी कोणती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा लागेल ते नोडल एजन्सी विनिर्दिष्ट करेल. जर विद्यमान राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करावयाची गरज असेल तर अर्जदाराला तसे कळविण्यात येईल.

(आय) दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करताना नोडल एजन्सी, ज्या दिनांकापासून दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्यात येईल तो दिनांक आणि तसेच आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पारेषण आकारांच्या विभागणीच्या पद्धतीवर आणि विद्यमान खर्चाच्या आणि किंमतीच्या आधारे देय होणारे अंदाजित पारेषण आकार, अर्जदाराला कळवेल.

(जे) राज्य पारेषण कंपनीने जर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश मंजूर केला तर, सविस्तर पद्धतीमध्ये करण्यात येतील अशा तरतूदींनुसार, अर्जदार दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशासाठी राज्य पारेषण कंपनीबरोबर ठोक वीज पारेषण करार करेल.

राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त, राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाकडे दीर्घ-कालीन प्रवेश प्राप्त करू पाहताना, अर्जदार राज्य पारेषण कंपनी आणि राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक यांच्याबरोबर त्रिपक्ष दीर्घ-कालीन प्रवेश करार करेल. दीर्घ-कालीन प्रवेशांसाठीच्या करारात दीर्घ-कालीन प्रवेशास सुरुवात झाल्याची तारीख, ग्रीडमध्ये विजेचा पुरवठा करण्याचे ठिकाण आणि ग्रीडमधून वीज काढण्याचे ठिकाण आणि सर्मपित पारेषण वाहिन्यांचा, आवश्यक असल्यास तपशील, समाविष्ट असेल. पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असल्यास, दीर्घ-कालीन प्रवेश करारामध्ये अर्जदार आणि पारेषण परवानाधारकांच्या सुविधांच्या बांधकामासाठीची काल-मर्यादा,

अर्जदाराने द्यावयाची बँकेची हमी आणि सविस्तर कार्यपद्धतीनुसार अन्य तपशील यांचा समावेश असेल.

(के) दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर केल्यानंतर नोडल एजन्सी राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवेल ज्यायोगे राज्य भार प्रेषण केंद्र या विनियमांखाली प्राप्त झालेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूरीसाठीच्या विनंत्यांची कार्यवाही करताना ही बाब विचारात घेईल.

(एल) दीर्घ-कालीन प्रवेशाच्या कालावधीची मुदत संपल्यानंतर, ग्राहकाने मुदत संपण्याच्या किमान सहा महिने आधी राज्य पारेषण कंपनीला लेखी विनंती करुन त्यात किती कालावधीसाठी वाढ करुन हवी असेल ते नमूद केल्यास त्याप्रमाणे मुदत वाढ देण्यात येईल;

परंतु असे की, वर विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत ग्राहकाकडून कोणतीही विनंती न आल्यास, सदर दीर्घ-कालीन प्रवेश, तो सुरुवातीला ज्या दिनांकापर्यंत मंजूर करण्यात आला असेल त्या दिनांकास समाप्त होईल.

## १३. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपध्दत :

### १३.१. आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यासः

या विनियम १३.२ मध्ये खाली काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य मध्यम-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधीत बाबी) विनियम, २००९ किंवा जे त्यांच्या वेळोवेळी सुधारणा केलेल्या फेर कायद्याप्रमाणे असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य मध्यम-कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेषण केंद्र, त्यांची संमती केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, ग्राहकाला संबंधीत वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवेल.

### १३.२ केवळ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास

येथे वर नमूद केलेल्या विनियम १३.१ मधील तरतूदीना अधीन राहून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणमधील राज्यांतर्गत मध्यम-कालीन प्रवेशांचा समावेश येथील पुढील उपखंड (ए) ते (एफ) मधील तरतूदींना अनुसरुन असेल –

(ए) मध्यम-कालीन प्रवेशास मंजूर करण्यासाठीच्या अर्जात सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद केलेल्या तपशीलाचा आणि विशेषतः, ग्रीडमध्ये विजेचा पूरवठा करण्याचे ठिकाण, ग्रीडमधून वीज काढून घेण्याचे ठिकाण आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज केलेल्या प्राप्त करुन घ्यावयाच्या विजेचे परिमाण, समावेश असेल. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी करावयाचा नमूना अर्ज जोडपत्र-२ मध्ये देण्यात आला आहे.

(बी) मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठीची प्रारंभीची तारीख ही अर्जदाराने त्यासाठी अर्ज केलेल्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपासून ५ (पाच) महिन्यांच्या आतील नसावी आणि १ (एक) वर्षाच्या नंतरची नसावी.

उदाहरणार्थ, मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी आलेल्या अर्जास १ जानेवारीला प्रारंभ झाल्यास तो अर्ज मागील वर्षीच्या जुलै महिन्याच्या ३१ तारखेपर्यंत घेण्यात येईल. त्याचप्रमाणे, मुक्त प्रवेशाच्या मंजूरीसाठी मागील वर्षीच्या ३१ जुलै रोजी सादर झालेला अर्ज त्याच वर्षीच्या १ ऑगस्टपासून प्रारंभ होणाऱ्या कालावधीसाठी नसेल.

(सी) अर्ज प्राप्त झाल्यानंतर, नोडल एजन्सी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये सहभागी असलेल्या अन्य कंपन्यांशी विचार-विनीमय करुन आणि समन्वय साधून, अर्जाची छाननी करील आणि येथे वरील विनियम ११ च्या खंड २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत मध्यम-कालीन प्रवेश मंजूर किंवा नामंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करेल;

परंतु असे की, जर नोडल एजन्सीला विचार-विनिमयाच्या किंवा समन्वयाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण आली तर ती आयोगाकडे योग्य निर्देश मागू शकेल.

(डी) विनियम ११ च्या खंड (२) खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात आल्याची खात्री झाल्यावर नोडल एजन्सी अर्जात नमूद केलेल्या कालावधीसाठी मध्यम-कालीन मुक्त प्रवेशांना मंजूरी देईलः

परंतु असे की, लेखी नोंदवण्यात आलेल्या कारणांसाठी, नोडल एजन्सी अर्जदाराने मागितलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीसाठी मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करील.

परंतु आणखी असे की, सविस्तर पद्धतीमध्ये करण्यात येतील अशा तरतूदींनुसार, अर्जदार मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी राज्य पारेषण कंपनीबरोबर ठोक वीज पारेषण करार करेल. राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त, राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाकडे मध्यम-कालीन प्रवेश प्राप्त करू पाहताना, अर्जदार राज्य पारेषण कंपनी आणि राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक यांच्याबरोबर त्रिपक्ष मध्यम-कालीन प्रवेश करार करेल. मध्यम-कालीन प्रवेशांसाठीच्या करारात मध्यम-कालीन प्रवेशास सुरुवात झाल्याची व समाप्तीची तारीख , ग्रीडमध्ये विजेचा पुरवठा करण्याचे ठिकाण आणि ग्रीडमधून वीज काढण्याचे ठिकाण आणि आवश्यक असल्यास सर्मपित पारेषण वाहिन्यांचा तपशील, अर्जदाराने द्यावयाची बँकेची हमी आणि सविस्तर कार्यपद्धतीनुसार अन्य तपशील यांचा समावेश असेल.

(इ) मध्यम-कालीन प्रवेश मंजूर केल्यानंतर नोडल एजन्सी राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवेल ज्यायोगे राज्य भार प्रेषण केंद्र या विनियमांखाली प्राप्त झालेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या विनंत्यांची कार्यवाही करताना ही बाब विचारात घेईल.

(एफ) मध्यम-कालीन प्रवेशाच्या कालावधीची मुदत संपल्यानंतर, मध्यम-कालीन ग्राहकास मध्यम-कालीन प्रवेशाच्या नूतनीकरणासाठी कोणताही विशेष अग्रहक्क देण्यात येणार नाही.

## १४. अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपध्दत

१४.१ **आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यासः**

या विनियम १४.१ मध्ये खाली काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य अल्प-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधीत बाबी) विनियम, २००८ किंवा जे त्यांच्या वेळोवेळी सुधारणा केलेल्या फेर कायद्याप्रमाणे असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य अल्प-कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेषण केंद्र, त्यांची संमती केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, ग्राहकाला संबंधीत वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवेल.

१४.२ **केवळ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यासः**

येथे वर नमूद केलेल्या विनियम १४.१ मधील तरतुदींना अधीन राहून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणमधील अल्प-कालीन मुक्त प्रवेश येथील पुढील उपखंड १४.२.१ ते १४.२.६ मधील तरतुदींना अनुसरुन असेलः

१४.२.१ <u>अग्रिम मुक्त प्रवेश</u>

(एक) नोडल एजन्सीकडे अल्प-कालीन मुक्त प्रवेश दुसऱ्या महिन्यापर्यंत मिळण्यासाठी अर्ज सादर करता येईल; असे करताना ज्या महिन्यात अर्ज करण्यात येत असेल तो महिना पहिला महिना म्हणून विचारात घेण्यात येईल.

(दोन) प्रत्येक महिन्यासाठी आणि महिन्यातील प्रत्येक व्यवहारासाठी वेगळा अर्ज करण्यात यावा.

(तीन) जोडपत्र-१ मध्ये (नमुना अल्प-कालीन-१) विहित केलेल्या नमुन्यामध्ये आवश्यक क्षमता, निर्मितीचे नियोजन किंवा वीज खरेदी करार, विजेचा पुरवठा करण्याचे ठिकाण, वीज काढून घेण्याचे ठिकाण, मुक्त प्रवेश मिळविण्याचा कालावधी, अत्युच्च विद्युत भार, सरासरी विद्युत भार अशी सविस्तर माहिती आणि नोडल एजन्सीला लागू शकणारी अन्य अतिरिक्त माहिती असलेला अर्ज नोडल एजन्सीकडे करण्यात यावा.

(चार) कोणत्याही महिन्यातील मुक्त प्रवेशांच्या मंजूरीसाठीचा अर्ज एका पाकिटावर 'अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज' असे लिहून आधीच्या महिन्याच्या १५ दिवसांपूर्वी सादर करण्यात यावा.

उदाहरणार्थ, जुलै महिन्यात मुक्त प्रवेश हवा असल्यास मुक्त प्रवेशासाठीच्या मंजूरीचा अर्ज १५ जूनपर्यंत प्राप्त व्हावयास हवा.

(पाच) नोडल एजन्सी अर्जदारास अर्ज प्राप्त झाल्याची 'पावती' वेळ आणि दिनांक दर्शवून देईल.

(सहा) मुक्त प्रवेश प्राप्त करण्याचा विचार करणाऱ्या वितरण परवानाधारकाचा ग्राहक त्याच्या पुरवठा क्षेत्रातील वितरण परवानाधारकाला त्याच्या अर्जाची प्रत देईल.

(सात) नोडल व्यवहारांच्या स्वरुपाच्या आधारावर एजन्सी अल्प कालीन मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जाबाबत येथे खाली देण्यात आलेल्या रीतीने निर्णय घेईल.

(आठ) वरील उप-उप-खंड (चार) अंतर्गत प्राप्त झालेले सर्व अर्ज या विनियमांच्या विनियम १७ खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वाटप अग्रक्रम निकषांप्रमाणे एकत्रितपणे विचारात घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

(नऊ) विजेच्या व्यवहारांमध्ये सहभागी असलेल्या पारेषण आणि वितरण यंत्रणांचा कोणताही भाग संकुलित होण्यासाठी (वाहिनी आणि ट्रान्सफॉर्मर) नोडल एजन्सी विजेच्या व्यवहारांची पाहणी करील.

(दहा) ग्राहकाला देय रकमेच्या निर्धारणासह (नमुना-अल्प-कालीन-२) नमुन्यामध्ये अशा आधीच्या महिन्याच्या १९ तारखेपूर्वी नोडल एजन्सी मुक्त प्रवेशाची मंजुरी किंवा अन्यथा कळविल.

(अकरा)उप-उप-खंड (दहा) खाली मुक्त प्रवेश नाकारण्यात आला तर नोडल एजन्सी निश्चित कारणे देईल.

१४.२.२. अग्रिम मुक्त प्रवेश

राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाच्या यंत्रणेमध्ये अतिरिक्त क्षमता उपलब्ध असेल, जी त्याने पूर्णपणे किंवा अंशतः निःसंदिग्धपणे स्वाधीन केलेली असेल किंवा पूर्वी तीन दिवसांपेक्षा अधिक काळ वापर केला नसेल, तर अग्रिम विजेच्या व्यवहारांना परवानगी देण्यात येईल.

(एक) नोडल एजन्सीकडून अग्रिम मुक्त प्रवेशाच्या मंजूरीसाठीचा अर्ज केवळ एक दिवस आधी, निर्धारित तारखेच्या आधी परंतु अग्रिम वीज व्यवहारांसाठीच्या निर्धारित दिवसाच्या लागोपाठ आधीच्या दिवसाच्या १३.०० तासानंतर, नसावा. उदाहरणार्थ, २५ जुलैच्या अग्रिम विजेच्या व्यवहाराकरिता २४ जुलै रोजी आणि त्या दिवसाच्या १३.०० वाजेपर्यंत अर्ज प्राप्त व्हावयास हवा.

(दोन) वरील खंड १४.२.१ च्या उप-उप-खंड (दहा) मध्ये देण्यात आल्याप्रमाणे जोडपत्र १ (नमुना-अल्प-कालीन २) च्या समान नमुन्यामध्ये नोडल एजन्सी अपेक्षित भाराची पाहणी करील आणि मंजूरीची परवानगी किंवा अन्यथा कळविल. अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जाच्या अन्य सर्व तरतुदी लागू राहतील.

१४.२.३. निविदा प्रक्रिया

(एक) पुढील महिन्यासाठी अग्रिम मुक्त प्रवेशाकरिता ग्राहकांनी मागितलेली क्षमता उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त असल्यास किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला विजेच्या व्यवहारामध्ये सहभागी असलेल्या पारेषण आणि वितरण यंत्रणेचा कोणताही भाग संकुलित झाल्याचे वाटल्यास, इलेक्ट्रॉनिक निविदा प्रक्रियेद्वारा वाटप करण्यात येईल.

(दोन) अपेक्षित संकुलतेच्या संदर्भात राज्य भार प्रेषण केंद्राचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहिल.

(तीन) राज्य भार प्रेषण केंद्र, संकुलतेची माहिती आणि जोडपत्र १ (नमुना-अल्प-कालीन ३) च्या नमुन्यावर किमान किंमत दर्शवून निविदा मागविण्याचा निर्णय, कळविल.

(चार) राज्य भार प्रेषण केंद्र त्याच्या संकेत-स्थळावर निविदाबाबत माहिती प्रदर्शित करील.

(पाच) आयोगाच्या आदेशाच्या आधारे निश्चित करण्यात आलेली पारेषण आणि वहन आकारांची किमान किंमत जोडपत्र-१ (नमुना--अल्प-कालीन-३) च्या नमुन्यात दर्शविण्यात येईल.

(सहा) जोडपत्र १ (नमुना--अल्प-कालीन ३) च्या निविदा आमंत्रणात दर्शविलेल्या 'निविदा समाप्तीच्या वेळे' पर्यंत जोडपत्र १ (नमुना--अल्प-कालीन ४) च्या नमुन्यामध्ये निविदा स्वीकारण्यात येतील. एकदा सादर केल्यानंतर निविदेमध्ये बदल/सुधारणा करता येणार नाही.

(सात) निविदा प्रक्रियेत एखादा ग्राहक सहभागी झाला नाही, तर त्याचा अर्ज मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्याबाबत कार्यवाही करण्यात येणार नाही.

(आठ) निविदा सादर करण्याची वेळ/तारीख वाढविण्याची कोणतीही विनंती राज्य भार प्रेषण केंद्र मान्य करणार नाही.

(नऊ) ज्या परिमाणात (डिनॉमिनेशन) किमान किंमत निश्चित करण्यात आली असेल त्याच परिमाणात, बोलीदार त्यांची किंमत (पूर्णांकात) नमूद करेल.

(दहा) नमूद करण्यात आलेली किंमत उतरत्या क्रमाने मांडण्यात येईल आणि उपलब्ध क्षमतेचे वाटप, उपलब्ध क्षमता संपेपर्यंत, अशा उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(अकरा) दोन किंवा अधिक ग्राहकांनी एकच किंमत नमूद केली असल्यास, वरील उप-उप-खंड (१०)खाली कोणत्याही टप्प्यावर उर्वरित उपलब्ध क्षमतांचे वाटप अशा ग्राहकांनी मागितलेल्या क्षमतेच्या यथाप्रमाणात करण्यात येईल.

(बारा) ज्या ग्राहकांना पूर्ण क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये मिळालेली उच्चतम किंमत अदा करतील.

(तेरा) ज्या ग्राहकांना कमी क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये त्यांनी नमूद केलेली किंमत अदा करतील.

(चौदा)कोणत्याही रीतीने अपूर्ण, संदिग्ध बोली किंवा बोलीच्या कार्यपध्दतीस अनुसरुन नसतील अशा निविदा राज्य भार प्रेषण केंद्र नाकारेल.

(पंधरा) क्षमतांचे वाटप करण्यात आलेले यशस्वी बोलीदार, या खंडातील उप-उप-खंड (बारा) किंवा (तेरा) खाली निविदेने निश्चित केलेले पारेषण आकार, वहन आकार, जसे असेल तसे, अदा करतील.

१४.२.४. अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाची राखीव क्षमता इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही.

१४.२.५. राज्य भार प्रेषण केंद्राकडून राखीव क्षमता परत किंवा कपात किंवा रद्द करण्यात आल्याने क्षमता उपलब्ध झाल्यास, या विनियमांनुसार ती अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकास राखीव ठेवण्यात येईल.

१४.२.६. अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या कालावधीच्या समाप्तीनंतर अल्प-कालीन ग्राहकास अल्प-कालीन प्रवेशाच्या नुतनीकरणासाठी कोणतेही सर्वाधिक प्राधान्य देण्यात येणार नाही.

## १५. राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र किंवा वितरण परवानाधारकाची मान्यता

### १५.१ आंतर-राज्य मुक्त प्रवेशः

राज्य पारेषण कंपनी दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जाच्या मंजूरीबाबत आणि राज्य भार प्रेषण केंद्र अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या मंजूरीबाबत त्याची संमती अथवा अन्यथा अनुक्रमे केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ आणि केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आंतर-राज्य पारेषणामध्ये प्रवेश) विनियम, २००८ किंवा त्यांच्या वेळोवेळी सुधारणा केलेल्या वैधानिक कायद्यांप्रमाणे, कळवेल. अर्जदार वितरण परवानाधारकाला जोडलेला असल्यास, सदर वितरण परवानाधारक अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून ३ दिवसात त्याची संमती अथवा अन्यथा कळवेल.

### १५.२ राज्यांतर्गत मुक्त प्रवेश :

(अ) निर्मिती केंद्राकडून मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जाची छाननी करताना, वितरण परवानाधारक खालील बाबींची पडताळणी करेल, जसे –

(एक) अंमलात असलेल्या राज्य ग्रीड संहितेमधील तरतूदींनुसार वेळ-गट-निहाय ऊर्जेचे मीटरींग करण्यासाठी आणि हिशोब ठेवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता;

(दोन) वितरण जाळ्यामध्ये क्षमतेची उपलब्धता.

(बी) आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि क्षमतेची उपलब्धता वितरण जाळ्यामध्ये असल्याचे सिद्ध झाल्यावर, वितरण परवानाधारक त्याची संमती अर्जदाराला, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या तीन (३) दिवसांत ई-मेल अथवा फॅक्स द्वारे अथवा अन्य कोणत्याही मान्यता देण्यात आलेल्या संपर्क साधनांनी कळवेल.

(सी) संमतीसाठी आलेला अर्ज कोणत्याही बाबतीत अपूर्ण अथवा सदोष असल्याचे वितरण परवानाधारकाच्या निदर्शनास आल्यास अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या दोन (२) दिवसांत वितरण परवानाधारक सदर उणीव अथवा दोष अर्जदाराला ई-मेल अथवा फॅक्सद्वारे अथवा अन्य कोणत्याही मान्यता देण्यात आलेल्या संपर्क साधनांनी कळवेल.

(डी) अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यावर, वितरण परवानाधारकाने आवश्यक पायाभूत सुविधा नसल्याच्या कारणास्तव किंवा वितरण जाळ्यामध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध नसल्यामुळे संमती देण्याचे नाकारले तर असा नकार वितरण परवानाधारक अर्जदाराला अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या तीन (३) दिवसांत ई-मेल अथवा फॅक्सद्वारे अथवा अन्य कोणत्याही मान्यता देण्यात आलेल्या संपर्क साधनांनी कळवेल.

## १६ थकबाकीदारांकडून आलेल्या अर्जांचा विचार

या विनियमांमध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, या विनियमांतील तरतुदींचे, विशेष करुन यातील वसूलीयोग्य आकारांचा भरणा वेळेत करण्यासंबंधातील तरतुदींचे, पालन न करण्याच्या कारणात्सव नोडल एजन्सीला मुक्त प्रवेशासाठी आलेला अर्ज नाकारण्याचे स्वातंत्र्य राहील.

## १७ वाटप करण्यासाठी प्राधान्य

१७.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील मुक्त प्रवेशाच्या वाटपास खालील निकषांनुसार प्राधान्य देण्यात येईल :

(ए) मुक्त प्रवेशासाठी आलेला अर्ज दीर्घ-कालीन, मध्यम-कालीन अथवा अल्प-कालीन प्रवेशासाठी असला तरी वितरण परवानाधारकाला मुक्त प्रवेश क्षमतेचे वाटप करण्यास उच्चत्तम प्राधान्य राहील.

(बी) वितरण परवानाधारकांनंतर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(सी) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांनंतर मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(डी) मध्यम-कालीन प्रवेशाच्या अर्जदारांनंतर अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(इ) अल्प-कालीन मुक्त प्रवेश अर्जदारांना क्षमतेच्या उपलब्धतेस अधीन राहून वाटपासाठी प्राधान्य राहील.

(एफ) संबंधित वर्गवारीखाली नवीन मुक्त प्रवेश ग्राहकापेक्षा विद्यमान मुक्त प्रवेश ग्राहकाला अधिक प्राधान्य राहील. परंतु त्यासाठी विद्यमान ग्राहकाने त्याच्या विद्यमानमुक्त प्रवेशाची मुदत संपण्यापूर्वी तीस दिवस आधी नूतनीकरणासाठी अर्ज दाखल केला असला पाहिजे.

(जी) जर अर्जदाराची संभाव्य गरज उपलब्ध क्षमतेपक्षा जास्त असेल आणि असा ग्राहक त्याची गरज उपलब्ध क्षमते इतकी कमी करु शकत नसेल तर, त्याच्यापेक्षा कमी प्राधान्य असलेल्या अर्जदाराची विनंती विचारात घेण्यात येईल.

## भाग इ : मुक्त प्रवेशासाठी आकार

### १८ पारेषण आकार

पारेषण यंत्रणेचा वापर करणारा मुक्त प्रवेश ग्राहक खाली नमूद केल्यानुसार आकार अदा करीलः-

१८.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी - केंद्रीय आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे

१८.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी - मुक्त प्रवेश ग्राहकांनी राज्य पारेषण कंपनी/पारेषण परवानाधारकाच्या यंत्रणेच्या केलेल्या वापरासाठी त्यांना द्यावयाचे पारेषण आकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम २००५ सह वेळोवेळी सुधारणा केलेले फेर-कायदे व सुधारणा अंतर्गत निश्चित करण्यात येतील.

परंतु असे की, मुक्त प्रवेशासाठी नोडल एजन्सीकडून मंजूर करण्यात आलेल्या क्षमतेच्या आधारे पारेषण आकार देय राहतील. परंतु आणखी असे की, मध्यम-कालीन प्रवेशासाठीचे पारेषण आकार दीर्घ-कालीन प्रवेश आकारांइतके असतील आणि सदर आकार मासिक तत्वावर देण्यात यावेत.

परंतु आणखी असे की, मुक्त प्रवेश वापरासाठीची समर्पित पारेषण यंत्रणा केवळ मुक्त प्रवेश ग्राहकाच्या वापरासाठी उभारण्यात आली असेल, अशा समर्पित यंत्रणेसाठी पारेषण परवानाधारक त्यांच्या संबंधित यंत्रणेसाठी पारेषण आकार ठरवेल आणि आयोगाकडून त्यास मान्यता घेईल आणि अन्य व्यक्ती किंवा उद्देशासाठी अतिरिक्त क्षमतेचे वाटप करण्यात येत नाही तोपर्यंत अशा मुक्त प्रवेश ग्राहकाला असे आकार सहन करावे लागतील.

१८.३. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठीचे आकार मासिक तत्वावर निश्चित आणि चुकते करण्यात येतील.

१८.४. प्रत्येक महिन्याच्या दहा (१०) तारखेला राज्य पारेषण कंपनीकडून अशा आकारांचे देयक पाठविण्यात येईल आणि मागील महिन्यासाठी निश्चित करण्यात आलेले आकार त्यामध्ये लिहिले जातील.

१८.५. पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला राजयांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी पारेषण आकारांच्या पंचवीस २५ टक्के अतिरिक्त दंड आकार द्यावे लागतील, जे अशा उपयोगकर्त्याला वाटप केलेल्या पारेषण क्षमता हक्कांव्यतिरिक्त असतील.

१८.६. वरील विनियम १८.५ नुसार, अशा रीतीने जमा झालेल्या रकमेचा वापर पारेषण परवानाधारक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने द्यावयाचे पारेषण आकार कमी करण्यासाठी करील.

१८.७. पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने न वापरलेल्या क्षमता हक्कांसाठी भरलेल्या पारेषण आकाराचा परतावा मिळण्याचा हक्क अशा उपयोगकर्त्यास राहणार नाही.

## १९ निर्धारण आणि यंत्रणा संचालन आकार

मुक्त प्रवेश ग्राहकांना निर्धारण आणि यंत्रणा संचालन आकार खालील दराने देय राहतील.

१९.१ आंतर-राज्य मुक्त प्रवेशांच्या बाबतीत

(ए) दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश

(एक) आधिनियमाच्या कलम २८ (४) अंतर्गत विनिर्दिष्ट केल्यानुसार, प्रादेशिक भार प्रेषण केंद्र शुल्क आणि आकारासह सकल भार प्रेषण आणि माहिती व संपर्क योजनेसाठीचे आकार.

(दोन) अधिनियमाच्या कलम ३२ च्या उप-कलम (३) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले राज्य भार प्रेषण केंद्र आकार

(बी) अल्प कालीन मुक्त प्रवेश

(एक) केंद्रीय/राज्य आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि राज्य भार प्रेषण केंद्र आकार

१९.२ राज्यांतर्गत मुक्त प्रवेशांच्या बाबतीत

संचालन आकारामध्ये निर्धारण आणि यंत्रणा संचालनासाठीचे शुल्क, ऊर्जा लेखे, वास्तविक पार्श्वभूमीवर निर्धारणामधील परिणामकारक सुधारणांसाठीचे शुल्क आणि वसुली आणि वितरणाचे आकार समाविष्ट आहेत. दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन प्रवेश आणि अल्पकालीन प्रवेश यांसाठीचे निर्धारण शुल्क आयोग खालील उप-खंड (ए) ते (इ) मधील तरतुदींना अनुसरुन निश्चित करीलः

(ए) राज्य भार प्रेषण केंद्र त्याच्या संचालन खर्चाचे अंदाजपत्रक तयार करील आणि सदर अंदाजपत्रक पुढील वर्षाच्या ३१ मार्च रोजी संपणाऱ्या आर्थिक

वर्षाच्या संबंधात प्रत्येक वर्षाच्या नोव्हेंबर महिन्याच्या ३० तारखेच्या आत आयोगासमोर सादर करीलः

(बी) सादर केलेल्या अंदाजपत्रकाची यथोचित छाननी केल्यानंतर, उचित वाटल्यास योग्य असे बदल करुन त्यास परवानगी देईल आणि वीज निर्मिती कंपनी आणि पारेषण कंपनीकडून राज्य पारेषण कंपनीने वसूल करावयाचे शुल्क आणि आकार विनिर्दिष्ट करील.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण तिच्या संचालनातून नफा प्राप्त करणार नाही.

परंतु आणखी असे की, पारेषण परवानाधारकास त्याच्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून पारेषण क्षमता हक्कांच्या यथाप्रमाणात राज्य भार प्रेषण केंद्राकडे भरण्यात आलेले शुल्क आणि आकार परत मिळविण्याचा अधिकार देण्यात येईल.

(सी) राज्य भार प्रेषण केंद्र निर्मिती कंपनी आणि पारेषण परवानाधारकांना आधीच्या महिन्याचे देय असलेले शुल्क आणि आकारांच्या संबंधातील देयक प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत पाठवेल.

(डी) राज्य भार प्रेषण केंद्र त्याच्या अंदाजपत्रकासहित मागील वर्षातील त्याच्या कोणत्याही शुल्क आणि आकारांची वाढ किंवा तूट यांचे सविस्तर विवरण सादर करील.

(इ) आयोग, वसुलीतील अशा शुल्क आणि आकारांची वाढ किंवा तुटीची यथोचित छाननी केल्यानंतर पुढील आर्थिक वर्षासाठी शुल्क आणि आकारांच्या उचित समायोजनास परवानगी देऊ शकेल.

# भाग एफ : काल व परिमाण निर्धारण, मीटरच्या नोंदी, सुधारणा आणि हानि

## २०. काल व परिमाण निर्धारण

२०.१.या विनियमाच्या पुढील खंडांत काहीही असले तरी, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केल्यानुसार आंतर-राज्य मुक्त प्रवेश व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण करण्यात येईल.

२०.२ मागील खंडाच्या अधीन राहून, ५ मेगावॉट आणि त्यावरील भाराच्या ग्राहकांच्या आणि सर्व निर्मिती केंद्रांच्या – त्यांची क्षमता कितीही असली तरीही - राज्यांतर्गत मुक्त प्रवेश व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्य ग्रीड संहितेच्या तरतुदींना अनुसरुन करण्यात येईल.

२०.३. पाच (५) मेगावॉटहून कमी भाराच्या मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत काल व परिमाण निर्धारण आवश्यक नसेल.

## २१ मीटरच्या नोंदी आणि संदेशवहन

२१.१. मुक्त प्रवेश ग्राहक आणि सर्व निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, त्यांची क्षमता कितीही असली तरी, राज्य पारेषण कंपनीकडून, ग्राहकांसाठी आणि त्यांच्या खर्चाने विशेष वीज मीटर बसविण्यात येतील.

२१.२. विशेष प्रकारच्या ऊर्जा मीटर्समुळे वेळेच्या गटवारीनुसार झालेला ॲक्टिव्ह वीज वापर आणि व्होल्टेजनुसार झालेला रिॲक्टिव्ह वीज वापर यांची मोजणी राज्य ग्रिड संहितेनुसार होईल.

२१.३. पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांनी, ज्यांच्याशी मुक्त प्रवेश ग्राहक जोडण्यात आले आहेत त्यांचे, विशेष वीज मीटर्स चांगल्या स्थितीत ठेवावेत.

२१.४. राज्य पारेषण कंपनी किंवा राज्य भार प्रेषण केंद्र यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने पाहणी करण्यासाठी विशेष वीज मीटर्स खुले असावेत.

२१.५. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या मीटर संबंधीच्या मानकांशी सर्व मुक्त प्रवेश ग्राहक बांधील राहतील. परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील आंतरबदल ठिकाणे आणि/किंवा मीटरींग ठिकाणे राज्य मीटरींग संहितेला अनुसरुन असतील.

परंतु असे की, राज्य ऊर्जा लेख्यांच्या सुलभीकरणासाठी मीटरींग संहितेमध्ये व्याख्या न केलेल्या आंतरबदल आणि/किंवा मीटरींग ठिकाणांची व्याख्या राज्य भार प्रेषण केंद्राकडून करण्यात येईल.

२१.६. राज्य भार प्रेषण केंद्राला ऊर्जा मीटर डाटा पुरवण्याची जबाबदारी ग्राहक आणि ग्राहक जोडला गेलेल्या पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांची संयुक्तपणे असेल.

२१.७. राज्य भार प्रेषण केंद्राला प्रत्यक्ष पाहणीच्या वेळी मुक्त प्रवेश उपयोगकर्ता त्याच्या निर्मितीच्या दृगोचरतेची खात्री देईल.

२१.८. ऊर्जा लेख्यांच्या प्रयोजनासाठी राज्य भार प्रेषण केंद्राला ऊर्जा मीटरमधील माहिती ऑन-लाईन कळविण्यात येईल.

२१.९. राज्य पारेषण कंपनी आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने पाहणी करण्यासाठी रिमोट ट्रान्समिशन युनिट - डेटा कॉन्सेन्ट्रेटर (आर टी यु - डीसी) खुले राहील.

२१.१०. प्रत्यक्ष वेळेच्या संदेशवहनासाठी नोडल एजन्सी आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने व्याख्या केलेल्या संदेशवहनाचा खर्च मुक्त प्रवेश ग्राहकाला सहन करावा लागेल.

२१.११. मुक्त प्रवेश ग्राहकाकडे दूरध्वनी/मोबाईल, फॅक्स आणि ई-मेल या सुविधा असाव्यात. नोडल एजन्सी आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला त्यांच्या संदेशवहन यंत्रणेचा तपशील पुरविण्यात येईल.

## २२. सुधारणा

निर्धारित ऊर्जेमध्ये सुधारणा करण्यास, आय.इ.जी.सी. किंवा राज्य ग्रीड संहितेमधील तरतुदीनुसार, जसे असेल तसे, परवानगी देण्यात येईल.

## २३. ऊर्जा हानि

२३.१ आंतर-राज्य पारेषण:

(एक) दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशः केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरुन खरेदीदार पारेषण यंत्रणेतील विभागून देण्यात आलेली ऊर्जा हानि सहन करील.

(दोन) अल्प-कालीन मुक्त प्रवेशः केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरुन मुक्त प्रवेश ग्राहकांकडून पारेषण यंत्रणेतील ऊर्जा हानिची वसुली करण्यात येईल.

२३.२. राज्यांतर्गत पारेषण:

आयोगाने लागू असलेल्या वर्षासाठी बहु-वर्षीय वीज दर/ वार्षिक कामगिरीचा आढावा/ वीज दर आदेश यामध्ये निश्चित केल्याप्रमाणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी पारेषण हानि मुक्त प्रवेश ग्राहकांनी प्रत्यक्ष वापरलेल्या ऊर्जेच्या प्रमाणात विभागून देण्यात येईल आणि वस्तु-रुपात अदा करण्यात येईल.

# भाग जी: असंतुलन आणि रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार

## २४. असंतुलन आकार

२४.१. दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश दिल्यानंतर सर्व व्यवहारांचे नियोजन (शेड्युलिंग) आंतर-राज्य व्यवहारांसाठी आय इ जी सी च्या संबंधित तरतुदींना अनुसरुन आणि राज्यांतर्गत व्यवहारांसाठी राज्य ग्रीड संहितेला अनुसरुन आगाऊ तत्वावर (डे-अहेड बेसिस) करण्यात येईल.

२४.२. मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत विजेचे निर्धारण आणि विजेचा पुरवठा आणि वापर यामधील तफावतीची हिशोबपूर्ती खालीलप्रमाणे करण्यात येईल :

२४.२.१. <u>अतिरिक्त वीज वापरः</u>

मुक्त प्रवेश ग्राहकांनी केलेला ज्यादा विजेकरिता खालील पर्यायांपैकी उच्च दर आकारण्यात येईलः

(एक) केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी काढलेल्या अधिसूचनेप्रमाणे अन्य कन्जेशन आकारासहित यु आय आकार, किंवा;

(दोन) राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पध्दतीखाली निश्चित केलेली यंत्रणा सर्वोच्च किंमत (सिस्टम मार्जिनल प्राईज), किंवा;

(तीन) वीज दर अनुसूचीत निश्चित केलेला तात्पुरता वीज दर, जो कोणताही अधिक असेल;

परंतु असे की, आंतर-राज्य अनिर्धारित विनिमय (यु आय) पद्धतीखाली कोणतेही प्रोत्साहन-अनुदान मिळाले असल्यास हे प्रोत्साहन अनुदान राज्य भार प्रेषण केंद्राकडून ठेवून घेण्यात येईल.

२४.२.२. कमी वीज घेणे :

मुक्त प्रवेश ग्राहकाने कमी वीज घेतल्यास, कोणतीही दंड आकरणी वसूल करण्यात आल्यास असे आकार मुक्त प्रवेश ग्राहकाकडून परत मिळविण्यात येतील.

परंतु आणखी असे की, आंतर-राज्य अनिर्धारित विनिमय पध्दतीखाली कोणतेही प्रोत्साहन प्राप्त झाल्यास राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पध्दतीला अनुसरुन राज्य भार प्रेषण केंद्राकडून ठेवून घेण्यात येईल.

२४.२.३ राज्यांतर्गत पारेषण आणि /किंवा वितरण यंत्रणा खंडित झाल्यामुळे निर्धारित विजेचा वापर करु न शकणे

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आणि/किंवा वितरण परवानाधारकाच्या जाळे खंडित झाल्यामुळे मुक्त प्रवेश ग्राहकास निर्धारित ऊर्जा घेणे शक्य झाले नाही तर पुरवण्यात आलेली वीज बँक पॉवर म्हणून गणली जाईल आणि वितरण परवानाधारकाला २४ तासांची आगाऊ नोटीस देऊन मुक्त प्रवेश ग्राहकास तीन (३) महिन्याच्या आत या विजेचा वापर करण्याची देण्यात येईल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहक अशा विजेचा वापर ज्या वेळेच्या गटवारीत वीज बँकेत जमा करण्यात आली असेल, त्याच वेळेच्या गटवारीत करु शकेल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहक ३ महिन्याच्या निर्धारित कालावधीत बँकेत जमा असलेली वीज वापरु शकला नाही तर अशी वीज व्यपगत झाल्याचे मानण्यात येईल.

२४.३. परंतु असे की, ग्राहकाला मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून, प्रत्यक्ष वापराच्या मर्यादेपर्यंत, निर्धारित हक्कांच्या सममूल्य एकूण भाराचा वापर करण्याची परवानगी देण्यात येईल आणि वितरण परवानाधारकाचा ग्राहक म्हणून मंजूर केलेल्या करारांतर्गत मागणीस परवानगी देण्यात येईल (या दोहोंची बेरीज अनुज्ञेय वापर असल्यामुळे). नोंदणी केलेल्या वापरामधून, मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून निर्धारित केलेल्या हक्काचे प्रथम समायोजन करण्यात येईल आणि उर्वरित शिल्लक ही ग्राहकाची मंजूर करारांतर्गत मागणी म्हणून मानण्यात येईल. नोंदणी करण्यात आलेल्या कमाल वापराचे हिशोब/ आकार खाली देण्यात आल्याप्रमाणे राहतील :-

२४.३.१. जेव्हा विजेचा ज्यादा वापर हा वितरण परवानाधारकाचा ग्राहक म्हणून मंजूर करारांतर्गत मागणी म्हणून हाताळण्यात येणार असेल तर वरील विनियम २४.३ नुसार मेळ घातल्यानंतर असलेला ज्यादा वापर हा मागणी अधिभार म्हणून ग्राहकावर, अशा ग्राहकांना लागू असलेल्या किरकोळ वीज दराच्या तरतुदींशी मिळत्याजुळत्या रीतीनुसार, लावण्यात येईल;

२४.३.२ मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून असलेल्या निर्धारित हक्कापेक्षा जेव्हा ग्राहकाचा नोंदलेला वीज वापर कमी असेल तेव्हा तो वरील विनियम २४.२.२ खाली कमी वापर म्हणून समजण्यात येईल.

तथापि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ आणि आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दरातील अनुसूचीनुसार ग्राहकाचे नियमन करण्यात येईल.

२४.४ निर्मिती कंपनी/ वीज व्यापार परवानाधारकाने घेतलेल्या मुक्त प्रवेशाच्या संबंधातील तफावतींची खालीलप्रमाणे पूर्ती करण्यात येईल :

२४.४.१ ज्यादा वीज पुरवठा :

वीज निर्माता/ व्यापाऱ्याने निर्धारित केलेल्या पुरवठ्यापेक्षा ज्यादा वीज पुरवठ्यामुळे जर ग्रिडचा फायदा झाला तर अशा ज्यादा वीज पुरवठ्याचा हिशोब हा आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या अनिर्धारित विनिमय आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (सिस्टिम मार्जिनल प्राइज - एम एम पी) किंवा राज्यात कार्यरत असलेल्या निर्मिती कंपनीच्या सर्वात कमी अस्थिर खर्चाने, जो दर कमी असेल त्यानुसार, करण्यात येईल.

निर्धारित केलेल्या पुरवठ्यापेक्षा वीज निर्माता/ व्यापाऱ्याने केलेला ज्यादा वीज पुरवठा जर ग्रिडला हानिकारक ठरला तर अशा ज्यादा वीज पुरवठ्याकरिता मुक्त प्रवेश निर्माता/व्यापारी, आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या अनिर्धारित आंतर-बदल आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने, (सिस्टिम मार्जिनल प्राइज - एम एम पी) जास्त असेल त्यानुसार, राज्य पूल मध्ये अदा करेल.

२४.४.२ कमी वीज पुरवठा

मुक्त प्रवेश निर्मात्याने निर्धारित केलेल्या पुरवठ्यापेक्षा कमी वीज पुरवठा केल्यास, त्याची भरपाई ग्रिडमधून करण्यात येईल आणि त्यासाठी

निर्माते/व्यापारी वितरण परवानाधारकाला, आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या अनिर्धारित विनिमय आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने, (सिस्टिम मार्जिनल प्राइज - एम एम पी), यापैकी जे जास्त असेल त्याप्रमाणे, आकार अदा करावे लागतील. त्याशिवाय, मुक्त प्रवेश ग्राहकाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि/ किंवा राज्य भार प्रेषण केंद्राकडून निश्चित केलेला कोणताही कंजेस्शन आकार, असल्यास, तो वितरण परवानाधारकाला अदा करण्यात येईल.

परंतु असे की, वितरण हानी, जर कोणताही निर्माता/ व्यापारी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला थेट जोडलेला असेल तर त्याच्याकडून वसूल करण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, जर सतत दोन दिवस विजेचा पुरवठा कमी प्रमाणात होत राहिला तर, राज्य भार प्रेषण केंद्र काल-परिमाण निर्धारणामध्ये (शेड्यूल) सुधारणा करण्यासाठी वीज निर्मात्याला/ व्यापाऱ्याला नोटीस देईल. जर वीज निर्माता/व्यापारी मुक्त प्रवेश काल-परिमाण निर्धारण (शेड्यूल) प्रमाणे विजेचा पुरवठा करण्यात अयशस्वी ठरला तर अशा परिस्थितीत वीज निर्माता व्यापाऱ्याने काल-परिमाण निर्धारण (शेड्यूल) मध्ये ताबडतोब सुधारणा करावी किंवा अन्यथा तो महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ आणि त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणांमध्ये आकरण्यात आलेल्या दंडास पात्र राहील. तथापि,

वीज निर्माता/व्यापारी संपूर्ण कालावधीकरिता पूर्ण राखीव क्षमतेसाठी मुक्त प्रवेश आकार अदा करण्यास पात्र राहील.

२४.४.३ राज्यामधील निर्मात्यांना जेव्हा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पध्दतीत सहभागीदार म्हणून घोषित करण्यात येईल तेव्हा त्यांना खालील बाबी लागू राहतील :

(ए) दिवसाभरात वेळेच्या कोणत्याही १५ मिनिटांच्या गटवारीतील घोषित क्षमतेच्या १०५ % पर्यंतची कोणतीही निर्मिती आणि सरासरी घोषित क्षमतेच्या १०१ % पर्यंत एकूण सरासरी गेमींग म्हणून मानण्यात येणार नाही आणि निर्धारित निर्मिती घोषित क्षमतेहून अधिक वीज निर्मितीसाठी वीज निर्मात्याला, अनिर्धारित विनियम (यु आय) आकार जे राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली यंत्रणा सर्वोच्च किंमत (सिस्टिम मार्जिनल प्राइस एस एम पी) म्हणून निश्चित करण्यात आले आहेत, ते मिळण्याचा हक्क राहिल.

(बी) विहित मर्यादांपेक्षा जास्त झालेल्या कोणत्याही वीज निर्मितीकरिता, राज्य भार प्रेषण केंद्र त्यात कोणतेही गेमींग नसल्याची खात्री करण्यासाठी तपास करेल आणि राज्य भार प्रेषण केंद्राला जर गेमींग असल्याचे आढळून आले तर, अशा निर्मिती केंद्राला अतिरिक्त वीज निर्मितीमुळे मिळणार असलेले संबंधित अनिर्धारित विनिमय आकार शून्यवत करण्यात येतील आणि लाभधारकांच्या अनिर्धारित विनिमय खात्यामध्ये ही रक्कम निर्मिती केंद्रामधील त्यांच्या क्षमतेच्या प्रमाणात समायोजित करण्यात येईल.

२४.५ निर्मिती कंपनी / व्यापार परवानाधारकाने घेतलेल्या मुक्त प्रवेशाच्या संबंधात परवानाधारकाची वहन यंत्रणा बंद पडल्यामुळे विजेच्या वहनात आलेले अपयश खालीलप्रमाणे हाताळण्यात येईल :-

२४.५.१ <u>आंतर-राज्य विक्री</u>

मुक्त प्रवेश निर्माता / व्यापाऱ्याने दिलेले काल-परिमाण नियोजन (शेड्यूल) राज्य भार प्रेषण केंद्राकडून पश्चिम विभागीय भार प्रेषण केंद्राकडे पाठवण्यात येईल. राज्याबाहेरील स्त्रोतांमधील वितरण परवानाधारकाच्या हिश्याचे त्यानुसार समायोजन करण्यात येईल आणि मुक्त प्रवेश निर्माता व्यापाऱ्याने निर्धारित केलेली ऊर्जा मुक्त प्रवेश निर्माता / व्यापाऱ्याने निश्चित केलेल्या खरेदीदाराला पाठविण्यात येईल;

२४.५.२ <u>राज्यातंर्गत विक्री</u>

वितरण परवानाधारकाने खरेदीदाराला पुरवलेल्या ऊर्जेकरिता, वितरण परवानाधारकाकडून मुक्त प्रवेश निर्मात्याला, राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली अनिर्धारित विनिमय दराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित केलेल्या एस एम पी ने किंवा करारांतर्गत पुरवठा दराने, जो कोणता कमी असेल त्यानुसार, किंमत अदा करण्यात येईल.

परंतु असे की, ज्या कालावधीत विजेचे वहन करण्यात आले नसेल त्या कालावधीसाठी राज्य यंत्रणेस मुक्त प्रवेश पारेषण आणि वहन आकार अदा करण्यास निर्माता/व्यापारी जबाबदार राहणार नाहीत.

२४.६ असंतुलन आकार अदा करण्यास उच्च प्राधान्य देण्यात येईल आणि संबंधित घटक (परवानाधारक किंवा मुक्त प्रवेश ग्राहक, जसे असेल तसे यांच्यासह) राज्य भार

प्रेषण केंद्रातर्फे कार्यान्वयित करण्यात येत असलेल्या राज्य असंतुलन पूल खात्यामध्ये, विवरणपत्र निर्गमित झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत, निर्देशित रक्कमेचा भरणा करेल. असंतुलन आकारामुळे ज्या व्यक्तीला रक्कम मिळावयाची आहे त्या व्यक्तीला राज्य असंतुलन पूल खात्यामधून कामाच्या तीन (३) दिवसात रक्कम अदा करण्यात येईल.

२४.७ वरील असंतुलन आकार अदा करण्यास जर दोन दिवसांपेक्षा अधिक, म्हणजेच विवरणपत्र निर्गमित करण्याच्या दिनांकापासून बारा (१२) दिवसांपेक्षा जास्त, विलंब झाल्यास कर्तव्यच्युत पक्षकाराला विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता ०.०४ टक्के या दराने व्याज द्यावे लागेल. व्याजाची ही वसुल केलेली रक्कम, ज्या व्यक्तीला रक्कम मिळावयाची होती, ज्या प्रदानास विलंब झालेला होता, त्या व्यक्तीला अदा करण्यात येईल. प्रदानास सातत्याने विलंब झाल्यास, जर काही, सुधारणात्मक कारवाई सुरु करण्यासाठी राज्य भार प्रेषण केंद्राकडून आयोगाला कळविण्यात येईल.

## २५ रिॲक्टीव्ह ऊर्जा आकार

२५.१. अधिनियमाच्या कलम ६१ खाली विनिदिष्ट करण्यात आलेल्या वीज दराच्या शर्ती आणि अटींनुसार निश्चित करण्यात आलेल्या पारेषण आकाराच्या भागाप्रमाणे पारेषण यंत्रणेचा भाग म्हणून पारेषण परवानाधारकाने स्थापित केलेल्या उपकरणाच्या माध्यमातून पुरविलेल्या रिॲक्टीव्ह ऊर्जेची नुकसानभरपाई परत मिळविण्याचा पारेषण परवानाधारकास हक्क राहिल

२५.२ जेव्हा रिॲक्टिव्ह ऊर्जा सामावून घेण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी निर्मिती केंद्राच्या ऑपरेशन ऑफ द फॅसिलिटीजकडून रिॲक्टिव्ह ऊर्जा नुकसानभरपाई पुरविण्यात येते तेव्हा आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे आकार राहतील आणि

रिॲक्टिव्ह ऊर्जेच्या वापराच्या प्रमाणात पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून हे आकार परत मिळविण्यात येतील.

परंतु असे की, जेव्हा रिॲक्टिव्ह ऊर्जा नुकसानभरपाई पारेषण परवानाधारकाकडून पुरविण्यात येते तेव्हा आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे आकार राहतील आणि अशा रिॲक्टीव्ह ऊर्जेच्या वापरात भर घालणाऱ्या पारेषण परवानाधारकाकडून हे आकार परत मिळविण्यात येतील.

परंतु आणखी असे की, पारेषण परवानाधारक रिॲक्टिव्ह ऊर्जेच्या एकूण खर्चाची विभागणी, आयोगाने निश्चित केलेल्या आकाराच्या आधारे, अशा रिॲक्टिव्ह ऊर्जेच्या वापराच्या प्रमाणात यंत्रणेच्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये करण्यात येतील.

## भाग एचः वाणिज्यिक बाबी

### २६ देयक तयार करणे, वसुली आणि वाटप

या विनियमां अंतर्गत देय असलेल्या आकारांच्या संबंधात खाली देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार देयक तयार करण्यात येईलः

२६.१. आंतर-राज्य व्यवहारः

२६.१.१. अल्प-कालीन मुक्त प्रवेश

(एक) केंद्रीय पारेषण कंपनी आणि राज्य पारेषण कंपनीच्या यंत्रणेचा वापर करण्यासाठीच्या पारेषण आकारांची वसुली आणि वितरण अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि राज्य भार प्रेषण केंद्राला देय असलेले कार्यान्वयन आकार, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीनुसार नोडल राज्य भार प्रेषण केंद्राकडून तयार करण्यात येतील.

२६.१.२. दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश

(एक) युनिफाईड लोड डिस्पॅच ॲण्ड कम्युनिकेशन स्कीम सहित राज्य भार प्रेषण केंद्राला देय असलेल्या आकारांचे देयक, वसुली आणि वितरण केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीनुसार राहिल.

(दोन) राज्य भार प्रेषण केंद्राला देय असलेल्या आकारांचे देयक राज्य पारेषण कंपनी/राज्य भार प्रेषण केंद्र पुढील कॅलेंडर महिन्याच्या तिसऱ्या (३) दिवसापूर्वी थेट मुक्त प्रवेश ग्राहकाला पाठविण्यात येईल.

(तीन) राज्य पारेषण कंपनीशी जोडलेला मुक्त प्रवेश ग्राहक देयक प्राप्त झाल्यावर कामाच्या पाच दिवसांच्या आत देयकाचा भरणा करील.

२६.२. राज्यांतर्गत व्यवहारः

२६.२.१. अल्प-कालीन मुक्त प्रवेश

राज्य भार प्रेषण केंद्राने अल्प-कालीन मुक्त प्रवेशाची परवानगी दिल्यानंतर कामाच्या ३ दिवसांच्या आत राज्य भार प्रेषण केंद्र पारेषण आकार आणि कार्यान्वयन आकार राज्य भार प्रेषण केंद्राकडे जमा करेल.

२६.२.२. दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश

राज्य भार प्रेषण केंद्र त्याला देय असलेल्या आकारांसह, असल्यास, मुक्त प्रवेश ग्राहकाला त्याचे देयक पुढील महिन्याच्या पाचव्या (५) दिवसापूर्वी पाठवेल. मुक्त प्रवेश ग्राहक या आकारांचा भरणा देयक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत करेल. राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र आणि लागू असलेल्या पारेषण परवानाधारकाला देय असणाऱ्या आकाराचे देयक मासिक तत्त्वावर पाठवेल.

## २७ विलंब भरणा अधिभार

या विनियमांखाली देय असलेल्या आकारांच्या कोणत्याही देयकाचा विहित कालावधीत भरणा करण्यास मुक्त प्रवेश ग्राहकाकडून विलंब झाल्यास, अधिनियमाखाली किंवा त्यातील कोणत्याही अन्य विनियमा खाली दायित्व असलेल्या कोणत्याही दंडास बाधा न येता, प्रति महिना १.२५ % दराने विलंब प्रदान अधिभार वसूल करण्यात येईल.

## २८ देयक अदा न केल्यास

या विनियमांखाली मुक्त प्रवेश ग्राहकाने अदा करावयाचा कोणताही आकार किंवा रकमेचा भरणा न केल्यास त्याने या विनियमांचे पालन न केल्याचे मानण्यात येईल. राज्य पारेषण कंपनी किंवा पारेषण परवानाधारक, दावा दाखल करुन अशा आकारांची वसुली करण्याच्या हक्कास बाधा न येता, पंधरा दिवसांची आगाऊ नोटीस दिल्यानंतर मुक्त प्रवेश खंडीत करु शकतील.

राज्य भार प्रेषण केंद्राला देय असलेले आकार अदा न केल्यास, अशा कसूरदार मुक्त प्रवेश ग्राहकाला निर्धारित वीज देण्यास हे केंद्र नकार देऊ शकेल आणि संबंधित परवानाधारकाला ग्रीडपासून अशा ग्राहकास खंडित करण्याचे निर्देश देऊ शकेल.

## २९ प्रदान सुरक्षा पध्दत

दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत, मुक्त प्रवेशासाठीचा अर्जदार, विविध आकार वसूल करण्यासाठी जबाबदार असलेल्या संस्थेच्या नावे, विविध आकारांच्या अंदाजित रकमेकरिता दोन महिन्याच्या कालावधीसाठी, एक परत न करता येण्याजोगे 'लेटर ऑफ क्रेडिट' उघडेल.

## ३० वीज पुरवठा करण्याची आणि वापराची ठिकाणे बदलण्यात लवचिकता

३०.१. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांच्या अशा विनंतीमुळे यंत्रणेवर होणाऱ्या परिणामाचा राज्य पारेषण कंपनीने अभ्यास करण्याच्या अधीन राहून, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकास एक वर्षातून दोन वेळा वीज पुरवठ्याचे ठिकाण आणि/किंवा वीज वापराचे ठिकाण यामध्ये बदल करण्याची परवानगी देण्यात येईल.

परंतु असे की, अर्जदाराला अशा तऱ्हेची लवचिकता प्रदान करताना विद्यमान ग्राहकांच्या हक्कावर त्याचा विपरित परिणाम होऊ नये.

३०.२. लवचिकतेच्या अधीन राहून, संपूर्ण वर्षासाठी मुक्त प्रवेश प्राप्त करणारे मध्यम-कालीन ग्राहक प्रवेश आणि/किंवा निर्गमना च्या ठिकाणात दोन वेळा बदल करु शकतील.

३०.३. वीज निर्मिती किंवा त्याच्याशी संबंधीत जाळ्यातून वीज पुरवठा बंद झाल्यामुळे कोणतीही आकस्मिकता निर्माण झाल्यास, तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य असल्यास, राज्य भार प्रेषण केंद्र अल्प-कालीन ग्राहकास वीज पुरवठ्याच्या ठिकाण किंवा ठिकाणांतील बदलास परवानगी देईल.

परंतु असे की, दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन प्रवेशाच्यासंबंधात विद्यमान मुक्त प्रवेश ग्राहक वीज पुरवठा आणि वापराच्या ठिकाणाच्या बदलासाठी राज्य पारेषण कंपनीकडे किमान तीन (३) महिने अर्ज आधी पाठविल.

परंतु असे की, पहिला बदल अंमलात आल्यापासून ६ महिन्याच्या कालावधीनंतर दुसऱ्या बदलास परवानगी देण्यात येईल. राज्य पारेषण कंपनीने असा अभ्यास करण्यासाठी केलेल्या सर्व खर्चाची संपूर्ण भरपाई असा ग्राहक करील.

परंतु असे की, वीज पुरवठा ठिकाण आणि/किंवा वीज वापर ठिकाणामधील कोणत्याही बदलास मुक्त प्रवेशाखाली करण्यात येणाऱ्या व्यवहारांच्या विजेच्या परिमाणात बदल नसल्यास केवळ परवानगी देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनीच्या जाळ्याशी जोडलेल्या आणि जोडणी घेण्याच्या विचारात असलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती कंपनीच्या वीज पुरवठ्याच्या ठिकाणात बदल करण्यात आल्यामुळे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१० च्या विनियम ३.१ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार पात्र व्यक्तिला अशी वीज विकण्याचा विचार करणारी किंवा वितरण परवानाधारकाव्यतिरिक्त असा परवानाधारक ज्याच्या वीज पुरवठा क्षेत्रात नूतनशील ऊर्जा जनरेटर स्थित आहे आणि जर अशी वीज इच्छुक लाभधारकाने घेतली नाही तर अशी ऊर्जा रद्द मानण्यात येईल.

# भाग आय : माहिती यंत्रणा

## ३१. माहिती यंत्रणा

३१.१. खालील खंड (एक) मधील सूचना वगळता, या विनियमांच्या अधिसूचनेच्या एकशे ऐंशी (१८०) दिवसांच्या आत, प्रत्येक पारेषण प्रणाली परवानाधारक इंटरनेटवरील त्याच्या संकेत-स्थळावर पुढील माहिती देईल :-

३१.१.१. या विनियमांची अधिसूचना नव्वद (९०) दिवसांच्या आत राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी असलेल्या शर्ती आणि अटी, ज्यात पुढील गोष्टी समाविष्ट असतील.

(ए) अर्जाचा नमुना, अर्ज देण्याची रीत व कार्यपध्दती आणि अर्जासोबत द्यावयाचे शुल्क;

(बी) ठोक ऊर्जा कराराचा नमुना व तो कार्यवाहीत आणण्याची रीत व कार्यपध्दती;

(सी) पारेषण शुल्क;

(डी) राज्यांतर्गत पारेषण प्रणालीचा वापर करण्यासाठी इतर शर्ती आणि अटी.

३१.१.२. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्यासाठी इतर शर्ती आणि अटी

(ए) राज्यांतर्गत पारेषण वाहिनी, वाहिनीची क्षमता आणि नोड्स दर्शविणारे पारेषण नकाशे;

(बी) राज्यांतर्गत पारेषण प्रणालीमधील पारेषण प्रणाली क्षमतेचे हक्क असलेल्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांची नावे व अशा प्रत्येक उपयोगकर्त्यांची क्षमता, कालावधी व प्रदान व आदान यांचे वर्णन;

३१.१.३. पुढील एका दिवसासाठीच्या तत्वावर तसेच मागील एक (१) दिवस, एक (१) महिना आणि एक (१) वर्षासाठी असलेल्या पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची माहिती;

३१.१.४. मागील बावन्न (५२) आठवड्यांसाठी, प्रत्येक आठवड्यात यंत्रणेत प्रदान केलेल्या एकूण ऊर्जेपैकी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील ऊर्जा हानिची टक्केवारी;

३१.१.५. या विनियमाखाली राज्य पारेषण कंपनीने तयार केलेली पारेषण यंत्रणा योजना;

३१.१.६. पुढील पाच वर्षांसाठी पारेषण यंत्रणा परवानाधारकाची नियोजित व मान्यताप्राप्त गुंतवणुकीचा तपशील.

३१.२. राज्य भार प्रेषण केंद्र त्याच्या संकेत-स्थळावरील वेब पेजमध्ये मुक्त प्रवेश माहिती या शीर्षकाअंतर्गत खालील माहिती प्रदर्शित करील आणि अशी माहिती असलेले मासिक किंवा वार्षिक अहवाल प्रसिध्द करील.

३१.२.१. दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांबाबतच्या सद्यस्थिती अहवालात खालील माहिती दर्शविली जाईलः-

(एक) ग्राहकाचे नाव;

(दोन) मंजूर झालेल्या मुक्त प्रवेशाचा कालावधी (प्रारंभाची तारीख आणि समाप्तीची तारीख);

(तीन) वीज पुरवठ्याचे ठिकाण;

(चार) वीज काढून घेण्याचे ठिकाण;

(पाच) वापरलेली पारेषण यंत्रणा आणि/किंवा वितरण यंत्रणा; आणि

(सहा) वापरलेली मुक्त प्रवेश क्षमता.

३१.२.२. विद्यमान अल्प-कालीन प्रवेश ग्राहकांबाबतच्या सद्यस्थिती अहवालात खालील माहिती दर्शविली जाईलः-

(एक) ग्राहकाचे नाव;

(दोन) मंजूर झालेल्या मुक्त प्रवेशाचा कालावधी (प्रारंभाची तारीख आणि समाप्तीची तारीख);

(तीन) वीज पुरवठ्याचे ठिकाण;

(चार) वीज काढून घेण्याचे ठिकाण;

(पाच) वापरलेली पारेषण यंत्रणा आणि/किंवा वितरण यंत्रणा; आणि

(सहा) वापरलेली मुक्त प्रवेश क्षमता.

३१.२.३. सर्वोच्च भार प्रवाह आणि सर्व अति उच्च दाब वाहिन्या आणि उच्च दाब वाहिन्यांवरील राखीव क्षमतेसह उपलब्ध क्षमता

३१.२.४. संबंधित परवानाधारकाने निश्चित केल्याप्रमाणे पारेषण आणि वितरण यंत्रणेतील सरासरी हानि संबंधी माहिती

# भाग जेः संकिर्ण

## ३२. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेश क्षमतेचा वापर करणे किंवा वापर न करणे

### ३२.१ दीर्घ-कालीन प्रवेशः

दीर्घ-कालीन ग्राहकास, शिल्लक कालावधीसाठी नुकसानभरपाईची रक्कम भरुन, दीर्घ-कालीन प्रवेशाच्या पूर्ण कालावधीच्या समाप्तीपूर्वी पूर्णतः किंवा अंशतः दीर्घ-कालीन प्रवेश हक्क सोडून देता येतील.

३२.१.१.किमान १२ वर्षासाठी प्रवेश हक्क प्राप्त झालेला दीर्घ-कालीन ग्राहक

(ए) एक (१) वर्षाची नोटीस – जर अशा ग्राहकाने राज्य पारेषण कंपनीकडे प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित तारखेच्या किमान एक (१) वर्ष आधी अर्ज सादर केल्यास कोणताही आकार लावला जाणार नाही.

(ब) एक (१) वर्षाहून कमी कालावधीची नोटीस – जर अशा ग्राहकाने राज्य पारेषण कंपनीकडे प्रवेश हक्क सोडून देण्याच्या एक (१) वर्षाहून कमी कालावधीत कोणत्याही वेळी अर्ज सादर केल्यास त्याला एक (१) वर्षाचा नोटीस कालावधी पूर्ण होण्यास जितका वेळ कमी पडत असेल त्या कालावधीतील पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांएवढी रक्कम अदा करावी लागेल.

३२.१.२. बारा (१२) वर्षांहून कमी कालावधीसाठी प्रवेश हक्क प्राप्त झालेला दीर्घ-कालीन ग्राहक

अशा ग्राहकाला बारा (१२) वर्षांचा प्रवेश हक्काचा कालावधी पूर्ण होण्यास जितका वेळ कमी पडत असेल त्या कालावधीतील पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांएवढी रक्कम (पूर्णांक किंमत) अदा करावी लागेल.

परंतु असे की, असा ग्राहक प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित तारखेच्या किमान एक (१) वर्ष आधी राज्य पारेषण कंपनीकडे अर्ज सादर करीलः

परंतु आणखी असे की, जर ग्राहकाने दीर्घ-कालीन प्रवेश हक्क सोडून देण्याच्या एक (१) वर्षाहून कमी कालावधीत कोणत्याही वेळी अर्ज सादर केल्यास त्याला एक (१) वर्षाचा नोटीस कालावधी पूर्ण होण्यास जितका वेळ कमी पडत असेल त्या कालावधीतील पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांएवढी रक्कम (पूर्णांक किंमत) अदा करावी लागेल, त्याशिवाय बारा (१२) वर्षांचा प्रवेश हक्काचा कालावधी पूर्ण होण्यास जितका वेळ कमी पडत असेल त्या कालावधीतील पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांएवढी रक्कम (पूर्णांक किंमत) अदा करावी लागेल.

३२.१.३. वीज मंत्रालयाने वितरण परवानाधारकांनी वीज प्राप्त करण्यासाठी निविदा प्रक्रियेने वीज दराच्या निश्चितीकरणासाठी प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सूत्रांना अनुसरुन केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेमध्ये निविदेचे मूल्यमापन करण्यासाठी वापरण्यात येत असलेला सवलत दर वरील खंड (३२.१.१) च्या उप-खंड (ए) आणि (बी) मध्ये नमूद केलेल्या निव्वळ वर्तमान मूल्याची परिगणना करण्यासाठी लागू करण्यात आलेला सवलत दर राहील.

३२.१.४. दीर्घ-कालीन ग्राहकांनी शिल्लक पारेषण क्षमतेसाठी अदा केलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेचा वापर, त्या वर्षातील अन्य दीर्घ-कालीन ग्राहक आणि मध्यम-कालीन ग्राहकांना अशा दीर्घ-कालीन ग्राहक आणि मध्यम-कालीन ग्राहकांना देय असलेल्या पारेषण आकारांच्या सरासरीत, देय असलेला पारेषण आकार कमी करण्यासाठी करण्यात येईल.

### ३२.२. मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक

मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक नोडल एजन्सीला किमान ३० दिवसांची आगावू सूचना देऊन पूर्णतः किंवा अंशतः हक्क सोडून देऊ शकेल.

परंतु असे की, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक त्याचे हक्क सोडून देताना सोडून देत असलेल्या कालावधीसाठीचे पारेषण आकार किंवा ३० दिवस यापैकी जे कमी असेल ती रक्कम अदा करील.

### ३२.३ अल्प-कालीन मुक्त प्रवेश

(ए) अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाने केलेल्या अर्जातील विनंतीनुसार, नोडल एजन्सीने अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी आगाऊ किंवा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर स्वीकारलेले काल व परिमाण निर्धारण रद्द किंवा कमी करता येईल.

परंतु असे की, अल्प-कालीन प्रवेश वेळापत्रक रद्द किंवा पूर्णपणे सुधारण्याचे किमान दोन (२) दिवसाच्या समाप्तीआधी अंमलात येणार नाही.

परंतु आणखी असे की, ज्या दिवशी नोडल एजन्सीने वेळापत्रक रद्द किंवा पूर्णपणे सुधारित करण्याची सूचना देण्यात आली असेल आणि ज्या दिवशी रद्द किंवा

सुधारित करण्याच्या अशा सूचनेची अंमलबजावणी करण्यात आली असेल ते दिवस दोन (२) दिवसाच्या कालावधीत गणले जाणार नाहीत.

(बी) नोडल एजन्सीने सुरुवातीला मंजूरी दिलेल्या काल व परिमाण निर्धारणास अनुसरुन आणि त्यानंतर नोडल एजन्सीने अशा काल व परिमाण निर्धारण रद्द किंवा कमी केल्याच्या कालावधीत तयार केलेल्या सुधारित काल व परिमाण निर्धारणास अनुसरुन, अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचे काल व परिमाण निर्धारण रद्द अथवा कमी करण्याची विनंती करणा-या व्यक्तिला काल व परिमाण निर्धारण रद्द किंवा कमी केल्याच्या कालावधीच्या, जसे असेल तसे, पहिल्या दोन दिवसाचे पारेषण आकार भरावे लागतील.

(सी) काल व परिमाण निर्धारण रद्द करण्यात आले असल्यास या विनियमाच्या विनियम १९ मध्ये निर्धारण करण्यात आलेले संचालन आकार पहिल्या दोन दिवसाकरिता किंवा रद्द केल्याच्या कालावधीतील दिवसांकरिता, जो कमी असेल त्याप्रमाणे, भरावे लागतील.

## ३३. मुक्त प्रवेशासाठी क्षमता उपलब्धततेची परिगणना

३३.१ राज्य पारेषण कंपनीकडून प्रत्येक पारेषण विभाग आणि प्रत्येक उप-केंद्रासाठी मुक्त प्रवेशासाठीच्या उपलब्ध क्षमतेची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईलः

३३.१.१. पारेषण यंत्रणा विभागाची उपलब्ध मुक्त प्रवेश क्षमता : = (डीसी – एसडी – एसी) + एनसी जेथे, डीसी = पारेषण विभागाची मेगावॉटमध्ये ढोबळ क्षमता, एसडी = विभागामध्ये नोंद झालेली मेगावॉटमधील सस्टेन्ड मागणी, एसी = आधीच वाटप केलेली क्षमता, परंतु मेगावॉटमध्ये प्राप्त न झालेली आणि एनसी = भर घालण्यासाठीची मेगावॉटमधील नवीन क्षमता.

३३.१.२. उप-केंद्राची उपलब्ध मुक्त प्रवेश क्षमता : = (टीसी – एसपी – एसी) + एनसी जेथे, टीसी = उप-केंद्राची एमव्हीए मधील ट्रान्सफॉर्मर क्षमता, एसपी = उप-केंद्राची एमव्हीए मध्ये सर्वोच्च मागणी, एसी = आधीच वाटप केलेली क्षमता, परंतु एमव्हीएमध्ये प्राप्त न झालेली आणि भर घालण्यासाठीची एमव्हीएमधील नवीन ट्रान्सफॉर्मर क्षमता.

३३.१.३. राज्य पारेषण कंपनी कॅलेण्डर महिन्याच्या पहिल्या दिवशी मासिक तत्वावर हे मूल्य अद्ययावत करील आणि तिच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील.

## ३४. मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य

राज्य संहितेच्या कार्यान्वयातील कोणत्याही तांत्रिक अडथळ्याच्या अधीन राहून, ग्राहकाच्या मुक्त प्रवेश सेवेचा संक्षेप करणे आवश्यक असल्यास, राज्य ग्रीड संहितेच्या गरजेच्या अधीन राहून, वितरण परवानाधारकाच्या मुक्त प्रवेशाचा सर्वात शेवटी संक्षेप करण्यात येईल. इतर सर्वांमध्ये, प्रथम अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाचा संक्षेप करण्यात येईल, त्यानंतर मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक, त्यापाठोपाठ दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाचा संक्षेप करण्यात येईल.

३४.१ राज्य संहितेच्या कार्यान्वयातील कोणत्याही तांत्रिक अडथळ्याच्या अधीन राहून, राज्य भार प्रेषण केंद्र राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापराच्या संक्षेपासाठी खालील तत्वांचा, संपूर्णतः किंवा अंशतः, अवलंब करीलः

(ए) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बिघाडामुळे उपलब्ध क्षमता कमी झाल्याने संक्षेप करणे जरुरीचे झाल्यास, अशा राज्यांतर्गत पारेषण यंत्रण किंवा तिचा भागाच्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा वापर, जसे असेल तसे, बिघाड चालू राहिल्यास, अशा कालावधीसाठी अशा पारेषण यंत्रणा उपयोगकत्याच्या पारेषण क्षमता हक्काचा यथाप्रमाणात संक्षेप करण्यात येईल;

(बी) राज्य भार प्रेषण केंद्राला योग्य प्रकारे सूचना देऊन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने अंतिम प्रेषण आणि वीज वापराच्या वेळापत्रकापासून फारकत घेतल्याने संक्षेप करणे जरुरीचे झाल्यास, अशा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या अशा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या वापराचा, अशा फारकतीच्या संपूर्ण व्याप्तीपर्यंत, प्रथम संक्षेप करण्यात येईल, ज्याला वरील खंड (ए) मध्ये नमूद केलेली तत्वे लागू राहतील.

३४.२ या विनियमांमध्ये काहीही तरतुदी असल्या तरीही, राज्य भार प्रेषण केंद्र आणीबाणिची स्थिती असल्यास आणि यंत्रणेची सुरक्षितता राखण्यासाठी, त्यास योग्य वाटतील अशा संक्षेपाच्या अन्य तत्वांचा अंमल करु शकेल.

३४.३ या विनियमांमध्ये काहीही तरतुदी असल्या तरीही, राज्य भार प्रेषण केंद्र **कोणत्याही पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या वापराच्या प्राधान्याच्या** संबंधात प्रादेशिक भार प्रेषण केंद्राकडून आलेल्या निर्देशांनुसार काम करील.

## ३५.    अन्य वाणिज्यिक अटी

अधिनियम आणि या विनियमांनुसार, प्रत्येक पारेषण परवानाधारक, या विनियमांच्या अधिसूचनेच्या साठ (६०) दिवसाच्या आत किंवा पारेषण परवानाधारकाच्या प्रारंभ दिनापासून साठ (६०) दिवसाच्या आत, अशा पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठीच्या अन्य वाणिज्यिक अटी, त्याच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील.

## ३६.    राज्य ग्रीड संहितेचे पालन

सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी राज्य ग्रीड संहितेचे पालन करणे त्यांचे कर्तव्य आहे :

परंतु असे की, कोणताही पारेषण परवानाधारक राज्य ग्रीड संहितेचे पालन करण्यास अपयशी ठरल्यास, अधिनियमाखाली दायित्व असलेल्या कोणत्याही दंडास बाधा न येता, अशा उपयोगकर्त्यासाठी राखून ठेवलेले पारेषण क्षमता हक्क, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास या प्रकरणी त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि आयोगाची परवानगी मिळाल्यानंतर, पारेषण परवानाधारकाकडून रद्द करण्यात येऊ शकतात.

## ३७. विद्यमान करार आणि नाकारण्याचा प्रथम हक्क

३७.१. या विनियमांच्या अधिसूचनेच्या आधीपासून अमलात असलेला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापराशी संबंधीत कोणताही विद्यमान करार किंवा दस्तऐवज किंवा उपकरण या अधिनियमातील तरतुदी आणि हे विनियम यांच्याशी विसंगत नसल्यामुळे वैध आणि बंधनकारक राहतील.

३७.२. ठोक वीज पारेषण कराराच्या अनुरोधाने राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वापरत असलेले विद्यमान पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना, अशा कराराच्या समाप्तीनंतर, अशा कराराच्या वाढीबाबत नकार देण्याचा प्रथम अधिकार राहीलः

परंतु असे की, किमान एक (१) वर्षाहून कमी नसलेल्या कालावधीच्या ठोक वीज पारेषण कराराच्या संबंधात पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते केवळ अशा नकार अधिकाराचा वापर करु शकतातः

परंतु आणखी असे की, असा मागण्यात आलेल्या नकाराचा प्रथम अधिकार जेथे वाढीचा कालावधी एक (१) वर्षाहून कमी नसेल त्यांनाच केवळ उपलब्ध राहील.

## ३८. दैवी आपत्ती

३८.१ दैवी आपत्तीची येथे अशी व्याख्या करण्यात येईल, अशी कोणतीही घटना जी नोडल एजन्सी किंवा अर्जदार किंवा आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा, जसे असेल तसे, यांच्या नियंत्रणाबाहेरील असेल, जी आगाऊ समजू शकत नाही किंवा वाजवी परिश्रमाने आगाऊ समजू शकत नाही आणि जी कराराच्या कामगिरीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम करु शकते. दैवी आपत्तीच्या घटनांमध्ये खालील बाबींचा समावेश असेलः

(एक) नैसर्गिक आपत्ती पूर, वादळ, दुष्काळ, भूकंप आणि साथीचे रोग यांसह परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही ;

(दोन) युध्द (घोषीत किंवा अघोषित), बंडाळी, हल्ला, शस्त्रास्त्र लढाई किंवा परकीय शत्रुच्या कारवाया यापैकी प्रत्येक घटना भारताशी संबंधीत किंवा थेट भारतावरील परिणाम, क्रांती, दंगल, प्रस्थापित सरकारविरुध्द जनतेचा उठाव किंवा अन्य नागरी क्षोभ, दहशतवादी कारवाया किंवा घातपाती कृत्ये यापैकी भारतातील प्रत्येक घटना;

(तीन) अणुस्फोट, अणुकिरणोत्सर्जी किंवा रसायन दूषितीकरण किंवा निर्मिती केंद्र, स्व-वापरासाठीची वीज निर्मिती प्रकल्प किंवा ग्राहक यांच्यावर थेट परिणाम करणारे आयोनायझिंग किरणोर्त्सग, आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा किंवा कोणतीही सुविधा किंवा यंत्रणा जी व्यवच्छेदक असेल आणि या कराराच्या कामगिरीसाठी महत्वपूर्ण असेल.

(चार) भारतातील कोणतीही घटना किंवा वर उल्लेख केलेल्या कोणत्याही घटनेतील काही बाबतीत सारख्या स्वरुपाची परिस्थिती.

परंतु असे की, मुक्त प्रवेश कराराचा पक्षकार असलेली कोणतीही व्यक्ति विनियम ३८.१ खाली निश्चित केलेल्या दैवी आपत्तीच्या घटनेमुळे अशा करारातील किंवा या विनियमांखालील कोणतेही कर्तव्य, पूर्णतः किंवा अंशतः वेळेवर किंवा आवश्यकतेनुसार, पार पाडू शकला नाही, तर, या विनियमांच्या अधीन राहून, अशी कर्तव्ये पार पाडण्याच्या त्या दैवी आपत्तीच्या घटनेने क्षतीग्रस्त व्यक्तीच्या क्षमतेवर परिणाम झाल्याने ही कर्तव्ये त्या मर्यादेपर्यंत स्थगित करण्यात येतील.

परंतु असे की, कोणताही पक्ष अशी दैवी आपत्तीची घटना घडल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत त्याची सूचना अन्य पक्षास लिखित स्वरुपात कळविल.

## ३९. दुरुस्तीचा अधिकार

आयोग या विनियमातील कोणत्याही तरतुदीमध्ये कोणत्याही वेळी बदल, फेरफार, सुधारणा किंवा दुरुस्ती करु शकतो.

## ४०. अडचणी दूर करण्याचा अधिकार

या विनियमांतील कोणत्याही तरतुदीच्या अंमलबजावणीत काही अडचणी निर्माण झाल्यास, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक आणि त्वरीत कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, आयोग, सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाने, राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र, राज्यांतर्गत परवानाधारक आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांना निर्देश देईल.

## ४१. आदेश व निर्देश देण्याच्या बाबी

या विनियमांच्या अंमलबजावणीसंबंधी, अधिनियमातील तरतुदींना अधीन राहून, आयोग वेळोवेळी आदेश व निर्देश देऊ शकेल.

## ४२. बचत

४२.१. या विनियमात नमूद केलेल्या बाबी वगळून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ या विनियमांची सुरुवात झाल्याच्या दिनांकापासून रद्द होतील.

४२.२. हे विनियम रद्द करण्यात आले असले तरी, या रद्द केलेल्या विनियमांखाली करण्यात आलेली किंवा केली आहे असे मानण्यात येणारी कोणतीही कारवाई ही या विनियमांखाली करण्यात आली आहे किंवा केली आहे असे मानण्यात येईल.

४२.३. हे विनियम अंमलात आल्याच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या करार/कंत्राट या खालील राज्यातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या मुक्त प्रवेश ग्राहकास पारेषण यंत्रणेतून अशा विद्यमान करार/कंत्राटाखाली त्याच शर्ती आणि अटींवर असा प्रवेश चालू ठेवण्याचा हक्क राहील. अशा विद्यमान करार/अटींच्या समाप्तीनंतर या विनियमाखाली अशा व्यक्ती दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश प्राप्त करण्यास पात्र राहतील. अशा विद्यमान करार/कंत्राटाच्या समाप्ती दिनाच्या किमान ३० दिवस आधी अशा व्यक्तिंनी दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश वर्गवारीखाली येण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

परंतु असे की, या विनियमांखाली आयोगाने निश्चित केलेले वहन आकार, क्रॉस-सबसिडी अधिभार, अतिरिक्त अधिभार, स्टॅण्ड-बाय आकार आणि अन्य कोणतेही आकार सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांना लागू राहतील.

४१.४ या विनियमातील कोणतीही बाब हे विनियम किंवा त्यांचा कोणत्याही भागापासून एखाद्या व्यक्तीला सवलत देण्याच्या आयोगाच्या अधिकाराला बाधित करणार नाही. मग असा अधिकार या विनियमांच्या अधिसूचनेच्या आधी अथवा नंतर वापरला गेला असो किंवा नसोः

परंतु असे की, अशी सूट देण्याआधी कोणत्याही हितसंबंधित किंवा बाधित पक्षकाराला आयोग निवेदन देण्याची शक्य तेवढी व्यवहार्य संधी देईल.

४१.५ या विनियमांतील कोणतीही बाब न्यायाच्या हितासाठी किंवा आयोगाच्या प्रक्रियेचा गैरवापर थांबविण्यासाठी आवश्यक असे आदेश काढण्यास आयोगाचे निहित अधिकार सिमित किंवा अन्य प्रकारे बाधित करणार नाही.

४१.६ एखाद्या प्रकरणात किंवा गटात उद्‌भवलेल्या विशिष्ट परिस्थितीत व लेखी कारणे नोंदवून तसेच अशा प्रकरणात किंवा प्रकरण गटात आयोगाला आवश्यक वाटल्यास या विनियमांमधील कोणत्याही विनियमांपेक्षा वेगळी व अधिनियमांच्या तरतुदींना सुसंगत असलेली कार्यपध्दती स्वीकारण्यास या विनियमांमधील कोणतीही बाब आयोगाच्या आड येऊ शकणार नाही.

४१.७ कोणतेही प्रकरण हाताळण्यास किंवा अधिनियमांमधील, ज्यासाठी कोणतीही विनियम बनविली गेली नाहीत असा कोणताही अधिकार वापरण्यास, या विनियमांमधील कोणतीही बाब प्रगटपणे किंवा ध्वनित अर्थाने आयोगाच्या आड येऊ शकणार नाही आणि आयोग, आयोगाला योग्य वाटेल त्या रीतीने अशी प्रकरणे, अधिकार व कार्ये हाताळण्याचे ठरविल.

मुंबई,

दिनांकः ,२०११

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग